RNI NO. MAHMAR/2020/84035


कायदेविषयक मार्गदर्शन मोफत



संपर्क
ॲड . सुशीला
मो नं 8766507294



BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ


**दि. 24 मार्च 2026**



1933- केंद्रीय कायदे मंडळात रंगा अय्यर यांनी मंदिर प्रवेश बील मांडले.

1942- क्रिप्स यांचे त्रिसदस्यीय प्रतिनिधी मंडळ इंग्लंडवरुन भारतात पुन्हा परत आले.

संकलन प्रा. यशवंत दुपटे


मंगळवार, २४ मार्च २०२६ | वर्ष : ६ | अंक : ८५ | दैनिक | किंमत : ₹५/-

Tuesday, 24 March 2026 | Year : ६ | Issue : 85 | Daily | Rate: Rs. 5/-


## लोकशाहीच्या रक्षणासाठी नागपुरात काँग्रेस-वंचित आक्रमक

# RSS विरोधात जनआक्रोश










**नागपूर :** नागपुरात RSS विरोधात काँग्रेस-वंचितचा संयुक्त मोर्चा काढला त्यामुळे शहरात राजकीय वातावरण तापले.

आज नागपूरमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ विरोधात काँग्रेस व वंचित बहुजन आघाडीच्या नेतृत्वाखाली मोठा मोर्चा काढला. या मोर्चाचे नेतृत्व काँग्रेसचे नेते हर्षवर्धन सपकाळ आणि वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी केले. आमदार विकास ठाकरेंसह दिग्गज नेते उपस्थित होते. अलीकडील काही राजकीय आणि वैचारिक घडामोडींविरोधात नाराजी व्यक्त करण्यासाठी हा मोर्चा आयोजित केला होता. संघाच्या विचारसरणीवर आणि त्याच्या सार्वजनिक जीवनातील प्रभावावर टीका करत विरोधकांनी हा आंदोलनात्मक मार्ग स्वीकारला. मोर्चा शहरातील प्रमुख भागातून काढण्यात आला. सकाळपासूनच मोठ्या संख्येने कार्यकर्ते, समर्थक, तसेच विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले. 'संविधान वाचवा', 'लोकशाही टिकवा', 'समता आणि न्याय द्या' RSS मुर्दाबाद अशा घोषणा देत मोर्चा पुढे सरकत होता.

मोर्चादरम्यान ॲड. बाळासाहेब आंबेडकर यांनी आपल्या भाषणात संघाच्या विचारसरणीवर तीव्र टीका केली. त्यांनी संविधानिक मूल्ये धोक्यात असल्याचा आरोप करत लोकांना सजग राहण्याचे आवाहन केले. तर हर्षवर्धन सपकाळ यांनी केंद्र सरकारवर आणि संघाच्या प्रभावावर निशाणा साधत लोकशाही संस्थांचे संरक्षण करण्याची गरज अधोरेखित केली. मोर्चा लक्षात घेता नागपूर पोलिसांनी मोठा बंदोबस्त ठेवला होता. शहरातील काही प्रमुख मार्गांवर वाहतूक वळविण्यात आली होती. कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी सतत देखरेख ठेवण्यात आली.

मोर्चाला अपेक्षित प्रतिसाद मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले. विविध सामाजिक गट, युवक आणि महिला मोठ्या संख्येने सहभागी झाल्याचे दिसून आले. या मोर्चामुळे नागपूरमध्ये राजकीय वातावरण चांगलेच तापले असून आगामी काळात या मुद्द्यावर आणखी राजकीय हालचाली वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. विरोधी पक्षांनी एकत्र येत केलेले हे शक्तिप्रदर्शन महत्त्वाचे मानले जात आहे.

## आदिवासी हक्क परिषदेत राहुल गांधींची प्रधानमंत्री मोदींवर जोरदार टीका

**वडोदरा :** काँग्रेसचे खासदार आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या पश्चिम आशिया संघर्षावरील भाषणावर लोकसभेत जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले की, पंतप्रधान मोदींनी आपल्या 25 मिनिटांच्या भाषणात अमेरिकेचा साधा उल्लेखही केला नाही. राहुल गांधी यांनी आरोप केला की, प्रधानमंत्री मोदी हे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या पूर्णपणे नियंत्रणात आहेत. राहुल गांधी म्हणाले की, यामुळेच प्रधानमंत्री संसदेत चर्चा करू शकत नाहीत. गुजरातच्या वडोदरा येथे आयोजित आदिवासी हक्क संविधान परिषदेला संबोधित करतांना राहुल गांधी यांनी ही टिप्पणी केली.



त्यांनी असाही आरोप केला की, भारतातील शेतीचा मोठा भाग अजूनही मानवी श्रमावर अवलंबून आहे, तर अमेरिकेत शेती मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकृत आहे. त्यामुळे, जर तेथून स्वस्त, मोठ्या प्रमाणावर उत्पादित वस्तू भारतीय बाजारपेठेत आल्या, तर स्थानिक शेतकऱ्यांना स्पर्धा करणे अवघड होईल.

राहुल गांधी म्हणाले की, यामुळेच यापूर्वी कोणत्याही प्रधानमंत्रीने कृषी क्षेत्र इतके पूर्णपणे खुले केले नव्हते, कारण यामुळे शेतकऱ्यांच्या उपजीविकेला धोका निर्माण होऊ शकतो. ते पुढे म्हणाले की, या करारामुळे पहिल्यांदाच एका भारतीय प्रधानमंत्रीने देशाचे कृषी क्षेत्र परदेशी उत्पादनांसाठी खुले केले आहे. राहुल गांधींच्या मते, जर अमेरिकन कृषी उत्पादने कोणत्याही निर्बंधांशिवाय भारतात येऊ लागली, तर त्याचे थेट नुकसान भारतीय शेतकऱ्यांना होईल. संविधान केवळ एक पुस्तक नाही, तर ती राष्ट्राची दूरदृष्टी आहे आणि हजारो वर्षे जुन्या विचारांचा समावेश करून प्रत्येक नागरिकाच्या हक्कांची हमी देते. त्यांनी असा आरोप केला की, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यासह भाजपचे नेते एकीकडे महान नेत्यांच्या पुतळ्यांना आदर दाखवतात, तर दुसरीकडे ते आदिवासींचे हक्क कमकुवत करतात.

### आरएसएस आणि प्रधानमंत्री मोदींवर निशाणा साधला...

राहुल गांधी यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले की, जेव्हा जेव्हा ते जात जनगणनेबद्दल बोलतात, तेव्हा आरएसएस आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी त्यांना विरोध करतात. वडोदरा येथे आदिवासी हक्क संविधान परिषदेला संबोधित करताना, काँग्रेस खासदाराने असेही म्हटले की, आदिवासींना 'वनवासी' म्हणणे हा संविधानाचा आणि आदिवासी नेते बिरसा मुंडा यांचा अपमान आहे. ते म्हणाले की, अशा शब्दांच्या वापरामुळे आदिवासी समाजाची ओळख कमी होते. ते म्हणाले की, आदिवासी नेते बिरसा मुंडा यांच्या वारशावर आणि विचारांवर हल्ला होत आहे. राहुल गांधी म्हणाले की, काही लोक संविधानाबद्दल बोलतात, पण तेच लोक आदिवासींच्या हक्कांना कमी लेखत आहेत.

## महत्त्वाच्या बातम्या

### स्थगितीच्या निर्णयावर इराणने अमेरिकेचे दावे फेटाळले



**नवी दिल्ली :** मध्य पूर्वेतील तणाव कमी होण्याच्या दृष्टीने अमेरिका आणि इराम यांच्यात चर्चा सुरू असून त्यातून तोडगा काढण्याचे प्रयत्न सुरू आहेत. दरम्यान, या चर्चा सकारात्मक सुरू असून पाच दिवसांची स्थगिती देण्यात आल्याची माहिती अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिली. मात्र, हा दावा इराणने फेटाळून लावला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी माघार घेतली असून युद्ध स्थगितीचे आदेश दिले असे अफगाणिस्तानमधील इराणच्या दूतावासांनी म्हटले. होर्मुझची सामुद्रधुनी सर्वांसाठी खुली करा, अन्यथा इराणच्या ऊर्जा प्रकल्पांवर हल्ले करू, असा थेट इशारा डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला होता. त्यांच्या या इशाऱ्याला गांभीर्याने घेऊन इराणने शत्रू देशांना वगळता इतर देशांकरिता हा मार्ग खुला केला. इराणने अमेरिकेच्या आदेशाचे पालन केल्याने अमेरिकेनेही आता इराणवरील ऊर्जा प्रकल्पांवरील नियोजित हल्ल्यांना स्थगिती दिल्याचे वृत्त समोर आले होते.

### अशोक खरातला पाठिशी घालणारे तीन अधिकारी कोण ?



**मुंबई :** संपूर्ण राज्यात गाजत असलेल्या नाशिक येथील भोंदूबाबा अशोक खरात याच्या काळ्या कर्तृत्वाचे पडसाद आज विधानसभेतही उमटले. महाविकास आघाडीच्या तीन आमदारांनी या प्रकरणातील धक्कादायक माहिती सभागृहात मांडली. काँग्रेसचे ब्रम्हपुरीचे आमदार विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणात तीन बड्या सनदी अधिकाऱ्यांचे लागेबांधे असल्याचा आरोप केला; तर आमदार नाना पटोले यांनी या विषयावर विधानसभेत विशेष चर्चा घडवून आणण्याची मागणी केली. त्याशिवाय ठाकरे गटाचे आमदार भास्कर जाधव यांनीही पुरोगामी महाराष्ट्राचे उदाहरण देत सत्ताधाऱ्यांना जाब विचारण्याचा प्रयत्न केला. आमदार विजय वडेट्टीवार यांनी भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणी धक्कादायक माहिती सभागृहासमोर ठेवली. पुरोगामी महाराष्ट्रात धर्माच्या नावाखाली महिलांचे शोषण करणाऱ्या अशोक खरातसारख्या भोंदू बाबांना अभय मिळणे, ही अत्यंत शरमेची बाब आहे.

### रेस्टॉरंटना पीएनजी पुरवठ्यात 20 टक्क्यांनी वाढ



**मुंबई :** महाराष्ट्रातील व्यावसायिक आस्थापनांना होणारा पाईपद्वारे नैसर्गिक वायूचा (पीएनजी) पुरवठा 20 टक्क्यांनी वाढवण्यात आला आहे. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबल यांनी सांगितले की, ही वाढ 23 मार्चपासून लागू होईल, ज्यामुळे एकूण पुरवठा 50 टक्क्यांवर पोहोचेल. यामुळे पश्चिम आशियातील युद्धामुळे प्रभावित झालेल्या रेस्टॉरंट आणि खानावळींना दिलासा मिळेल. हॉटेल उद्योग वाढीव गॅस पुरवठ्याची मागणी करत होता.

## ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या निधनाने विदर्भाच्या विकासाचा आधारवड हरपला : डॉ. नितीन राऊत

**वर्धा :** माजी खासदार व सावंगी येथील मेघे अभिमत विद्यापीठाचे कुलपती दत्ता मेघे यांची निधन वार्ता आणि सर्व जिल्हा स्तब्ध झाल्याचे चित्र उमटले आहे. सावंगीत स्टाफच नव्हे तर रुग्ण पण विमनस्क. त्यांचा व्यक्तिगत स्टाफ रडवेला तर त्यांच्यामुळे आयुष्य घडल्याची भावना असणारे हुंदके देत भावनांना वाट देत आहे. आयुष्य घडले, जीव वाचला, मुलगा शिकला, संसार वाचला, लग्नास आधार मिळाला अश्या मेघे यांच्या आठवणी काढणारे असंख्य. पण राजकारणात नाव मिळाले ते मेघे साहेबांच्या कृपेने, असे म्हणणारे पण आहेच.

2014 च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी दत्ता मेघे यांचे बोट पकडून भाजप प्रवेश करणारे डॉ. पंकज भोयर यांना राजकीय चमक मिळाली ती मेघेमुळेच. वर्धा विधानसभा क्षेत्राची इतरांस मिळालेली भाजपची उमेदवारी कापून ती भोयर यांना नितीन गडकरी यांच्याकडे वजन खर्च करीत मेघे यांनीच मिळवून दिली. पूढे डॉ. भोयर यांना मागे वळून बघावेच लागले नाही. ते म्हणतात की मला त्यांच्याकडून पुत्रवत प्रेम मिळाले. त्यांचे नेहमी सांगणे असायचे की मोठ्यांची आज्ञा पाळावी. नितीन गडकरी व देवेंद्र फडणवीस यांना विचारल्याशिवाय काही करू नको. विश्वास संपादन कर. त्यांचा हा सल्ला मी कायमचा लक्षात ठेवील, असे पालकमंत्री डॉ. भोयर म्हणतात. पवणार येथील अंत्यविधीची तयारी त्यांच्याच देखरेखीत सूरू आहे. सावंगीत अभिमत विद्यापीठ सूर करीत त्याची भरभराट करण्यात मेघे यांना डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांची मोलाची साथ मिळाली.



"राज्याचे माजी मंत्री आणि ज्येष्ठ नेते दत्ताजी मेघे यांच्या निधनामुळे महाराष्ट्राच्या राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. त्यांच्या निधनाने विदर्भाने आपला एक खंबीर आधारवड आणि मार्गदर्शक गमावला आहे, अशा शब्दांत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते व माजी मंत्री आमदार डॉ. नितीन राऊत यांनी आपल्या शोकसंवेदना व्यक्त केल्या. दत्ताजी मेघे यांच्या निधनावर दुःख व्यक्त करताना डॉ. राऊत म्हणाले की, दत्ताजींचे जाणे ही केवळ राजकीय क्षेत्राची नव्हे, तर माझी वैयक्तिक हानी आहे. त्यांनी शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात केलेले कार्य हे येणाऱ्या अनेक पिढ्यांसाठी दीपस्तंभासारखे राहील. वर्धा आणि नागपूर जिल्ह्याच्या विकासात त्यांचे योगदान विसरता येणार नाही. राजकारणात सक्रिय असतानाही त्यांनी सर्वपक्षीय नेत्यांशी प्रेमाचे आणि जिव्हाळ्याचे संबंध जोपासले होते. शिक्षण आणि आरोग्याचा ध्यास. दत्ताजींनी केवळ संस्था उभ्या केल्या नाहीत, तर त्या माध्यमातून ग्रामीण भागातील सर्वसामान्य कुटुंबातील मुलांच्या हातात शिक्षणाची पाटी दिली. समाजातील वंचित घटकांसाठी त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील. मी दत्ताजी मेघे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. मेघे परिवार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांवर ओढवलेल्या या कठीण प्रसंगी मी त्यांच्या दुःखात सहभागी आहे. त्यांच्या परिवाराला हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो अश्या शब्दात डॉ. राऊत यांनी दिवंगत दत्ता मेघे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.



## राष्ट्रीय परीक्षा एजन्सीने जेईई मुख्य सत्र 2 परीक्षेच्या तारखा केल्या जाहीर

**मुंबई :** राष्ट्रीय परीक्षा एजन्सीमार्फत घेण्यात येणाऱ्या जेईई मुख्य 2026 च्या सत्र 2 परीक्षेच्या तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. त्यानुसार ही परीक्षा 2 ते 8 एप्रिलदरम्यान होणार आहेत. ही परीक्षा देशातील विविध शहरातील परीक्षा केंद्रांसह परदेशातील 15 शहरांमध्ये होणार आहे. जेईईसाठी परीक्षा केंद्रांच्या शहरांची माहिती विद्यार्थ्यांच्या लॉगीनमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे. अभियांत्रिकी, आर्किटेक्चर, शहर विकास नियोजन यासंदर्भातील अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या जेईई मुख्य परीक्षेच्या सत्र 2 मधील परीक्षा एप्रिलमध्ये होणार आहेत. यामध्ये बी.ई./बी.टेक (पेपर 1) परीक्षा 2, 4, 5, 6 आणि 8 एप्रिल 2026 रोजी होणार आहे. तर बी.आर्क (पेपर 2 ए) आणि बी.प्लॅनिंग (पेपर 2 बी) तसेच दोन्ही पेपरसाठी परीक्षा 7 एप्रिल 2026 रोजी होणार आहे. दरम्यान, परीक्षेला नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षा केंद्राच्या शहराची माहिती देण्यासाठी 'एग्झाम सिटी इंटिमेशन स्लिप' राष्ट्रीय परीक्षा एजन्सीच्या अधिकृत संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांनी https://jeemain.nta.nic.in/, https://jeemain.nta.nic.in/ या संकेतस्थळावर लॉगिन करून ही स्लिप डाउनलोड करून परीक्षेला कोणते केंद्र आले आहे, याची खातरजमा करून घ्यावी, असे आवाहन राष्ट्रीय परीक्षा एजन्सीकडून करण्यात आले आहे.

## भंडाऱ्यात पूजा खेडकर प्रकरणाची पुनरावृत्ती

**भंडारा :** दिव्यांगत्वाचे बोगस प्रमाणपत्र सादर करून शासकीय नोकरीत शिरकाव करणाऱ्या भंडारा महसूल प्रशासनातील 7 अधिकाऱ्यांवर बडतर्फ तसेच निलंबनाची कारवाई करण्यात आल्याने प्रशासनात प्रचंड खळबळ उडाली आहे. महसूल विभागातील एकूण 22 दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांची नागपूर वैद्यकीय मंडळामार्फत पुनर्तपासणी करण्यात आली होती. त्यापैकी 7 अधिकाऱ्यांची प्रमाणपत्रे बोगस निष्पन्न झाल्यानंतर बोगस प्रमाणपत्राद्वारे नोकरी मिळवल्याचा ठपका ठेवत तीन अधिकाऱ्यांना बडतर्फ तर तीन जणांना निलंबित करण्यात आले आहे. शिवाय एका नायक तहसीलदाराला बडतर्फ करण्यासंदर्भात शासनाला प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे नोकरी लाटणाऱ्यावर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते विजय क्षीरसागर यांनी मागील तीन वर्षांपासून लावून धरली होती. क्षीरसागर यांच्या तक्रारीच्या आधारे भंडारा जिल्ह्यातील शासकीय नोकरी मिळविलेल्या 322 दिव्यांगांसह प्रमाणपत्रांची पडताळणी सुरू झाली. या पुनर्तपासणीतून दिव्यांगत्व जास्त दाखविणे, दिव्यांग नसताना बोगस प्रमाणपत्राआधारे नोकरी मिळविणाऱ्या बोगस दिव्यांगांचा पर्दाफाश होण्यास सुरुवात झाली आहे.

## 179 सरकारी कंपन्यांच्या संचालक मंडळावर एकही महिला संचालक नाही...




**नवी दिल्ली :** भारतीय सरकारने सोमवारी लोकसभेत सांगितले की, सरकारी कंपन्यांमध्ये महिलांचा सहभाग मर्यादित आहे. सरकारच्या उत्तरात म्हटले आहे की, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांसह 179 सरकारी कंपन्यांच्या संचालक मंडळावर अद्याप एकही महिला संचालक नाही. कंपनी कायद्यानुसार काही विशिष्ट कंपन्यांमध्ये किमान एक महिला संचालक असणे बंधनकारक आहे.

आम्ही तुम्हाला सांगू इच्छितो की, कंपनी कायदा 2013 नुसार, प्रत्येक सूचीबद्ध कंपनी आणि इतर प्रत्येक सार्वजनिक कंपनी, जिचे पेड-अप शेअर कॅपिटल 100 कोटी रुपये किंवा त्याहून अधिक आहे, किंवा जिची उलाढाल 300 कोटी रुपये किंवा त्याहून अधिक आहे, तिला आपल्या संचालक मंडळावर किमान एका महिला संचालकाची नियुक्ती करणे बंधनकारक आहे. लोकसभेला दिलेल्या लेखी उत्तरात, कॉर्पोरेट व्यवहार राज्यमंत्री हर्ष मल्होत्रा म्हणाले की, एकूण 708 सरकारी कंपन्यांपैकी 529 कंपन्यांनी महिला संचालकांची नियुक्ती केली आहे, तर 179 कंपन्यांनी केलेली नाही. ते म्हणाले की, महिला संचालकांच्या नियुक्तीसाठीच्या किमान मानकांचे पालन न करण्याचे कारण कंपनी आणि प्रशासकीय कारणानुसार बदलते. राज्यमंत्री मल्होत्रा यांनी यावरही जोर दिला की, सरकारने या कंपन्यांवर लादलेल्या दंडाची माहिती केंद्रीय स्तरावर उपलब्ध नाही. सर्वात अलीकडील आर्थिक वर्षात 13 मार्चपर्यंत, सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या संचालक मंडळावर 668 महिला संचालक आणि 3,423 पुरुष संचालक होते.

### लोकसभेच्या कामकाजाची वेळ वाढवली

**नवी दिल्ली:** शनिवार आणि रविवार तसेच ईद आणि चैत्र शुक्ल प्रतिपदानिमित्त दीर्घ विश्रांतीनंतर, संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाचे कामकाज आज पुन्हा सुरू होईल. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह राज्यसभेत एक महत्त्वाचे विधेयक सादर करतील. लोकसभेतील प्रश्नोत्तराचा तास सकाळी 11 वाजता सुरू होईल.










जिवेत शरदः शतम्!

प्रा .घनश्याम धाबर्डे

शुभेच्छूक

डॉ. प्रेरणा (मुलगी), डॉ. महेंद्र कांबळे (जावई), सिद्धार्थ धाबर्डे (मुलगा), धम्म संगोष्ठी, सम्यक संकल्प संघ, बुद्ध विहार समन्वय समिती, बहुजन मैत्री संघ, वंदना संघ, दीक्षाभूमी, संविधान दिवस समारोह कृती समिती, दैनिक बहुजन सौरभ परिवार.



रजि. नं. महाराष्ट्र नाग. ८०२/२०१८ व ३६४७७/२०१९

बुध्द विहार समन्वय समिती

व्दारा संचालित

बुध्दीस्ट हेरीटेज ॲण्ड कल्चर कन्झर्वेशन कमिटी

आयोजित

पवनी लेणी व उत्खनन, शांतिवन बुध्द विहार चिंचाड, गोसेखुर्द धरण, महास्तुप व बुद्ध विहार सिंदपुरी, गोठनगांव दर्शन व धम्म अभ्यास सहल

(टिप : डॉ. मधूकर कठाने, पुरातत्व शास्त्रज्ञ यांच्या सहवासात )



दिनांक २९/३/२०२६ रविवार सकाळी ६ वा. ते रात्री ९ वाजेपर्यंत

नाश्ता चहा व दुपारच्या जेवणासह लक्झरी बस ने

देणगी शुल्क रु. ९००/- प्रति व्यक्ती • ५ वर्षाच्या मुलांना निशुल्क

बुकिंग साठी अंतीम दिनांक २५/३/२०२६

देणगी शुल्क QR कोड नी टाकणे अनिवार्य शुल्क जमा केल्याचा स्कीन शॉट पाठवावा ज्यांना तसें जमत नाही त्यांनी दुसऱ्या व्यक्तीकडून करवून घेणे, सोबत पाणी बाटली खाद्य पदार्थ टोपी गमछा ठेवावा. पांढरे शुभ्र वस्त्र परिधान करावे.

Bank of India
BUDDHA VIHAR SAMANVAY SAMITI PALI BHASHA
SCAN & PAY
boim-874001501414@boi
रक्कम भरल्यानंतर Screen Shot पाठवावा

धम्म सहलीला येणाऱ्या प्रवाशांसाठी सूचना

- मधुमेही प्रवाशांनी आपल्या सोबत औषधी व खाद्य पदार्थ ठेवावे.
- प्रत्येक स्पॉट वरील वेळ हे प्रवाशांच्या सहकार्यावर व बसवर अवलंबुन राहील.
- सहलीची देणगी रक्कम मिळाल्या शिवाय प्रवेश निश्चित होणार नाही. • सोबत आधारकार्ड आणावे.
- सहकार्याची भावना असलेल्या प्रवाशांनीच या सहलीला यावे.

• संपर्कासाठी क्षेत्रानुसार प्रतिनिधी •

सुगत नगर :- कांताप्रसाद रामटेके मो. ८०५५३८३८०७ वैशाली नगर :- एम.व्ही. नाईक मो. ९४२२८१८८७३ सोनेगाव :- गौतम मोडक मो. ९४२३६३४९८४, डॉ. प्रमिला सरस्वती मो. ८७८८६०७३२३ अग्ने ले-आऊट :- हीरामण वाघमारे मो. ९८९०१८१८३४, स्नेहल पाटील मो. ८४५९७३६८८६ मानेवाडा :- अशोक झामरे मो. ९७६३८२०८६७ पांडे ले-आऊट :- पेनुल्तम बोम्बर्डे मो. ९५६१५०१७८८ सदभावना नगर :- उत्तम मेश्राम मो. ७७०९७१४२९९ बेलतरोडी :- सिध्दार्थ खोब्रागडे मो. ९४२३१२२३७५ सदर :- अरविंद नगरकर मो. ९९६०२३००२३ गोपाल नगर :- दिलीप वागडे मो. ८३०८००१२१४ कर्नलबाग :- मायाताई जामगडे मो. ९३७१५९२७३५ वाडी :- सिध्दार्थ लोखंडे मो. ८६५७९७६७९० नरेंद्र नगर :- व्ही.पी. वाघमारे मो. ९४२३६८०१५०, देवांगीनी कांबळे मो.९७६६९१६६१० हिरवीनगर :- विश्वनाथ लोखंडे मो. ८७८८२६१९४७ सुरेंद्र नगर :- प्रा. घनश्याम धावर्डे मो. ९९७००७१५५० विवेकानंद नगर :-अनिल गौतम मो. ८८३०८०४७७० हजारी पहाड :- नरेश मेश्राम मो. ९४२३४०४८६१

महिला प्रतिनिधी:- सुचिता बुरबुरे मो.८४५९२५४९४०, प्रमिला सोनवणे मो. ८६६८७१२०२३ तनुजा झीलपे मो.८६००३५०८३८ सुविता लोंखडे मो. ७८४१९३८२७८ तारा गजभिये मो. ९३७३३५०३२३ गोपिकाताई खोब्रागडे मो.९४२३३०९३२८ प्रमिला चिंचखेडे मो. ८७८८६०७३२३ माधुरी लोखंडे मो. ७७०९००३८३४

अधिक माहिती साठी संपर्क : ईंजि. ए.के. पाटील -7972987584 प्रा.आनंद वासनिक -9822238757

बहुजन सौरभ

# संपादकीय

## संवैधानिक तटस्थता की वैचारिक झुकाव?

भारताच्या लोकशाही व्यवस्थेत काही संवैधानिक पदे ही केवळ अधिकारांची नव्हे तर नैतिक जबाबदाऱ्यांची प्रतिके मानली जातात. उपराष्ट्रपती हे त्यापैकी एक अत्यंत महत्त्वाचे पद आहे. सध्याचे उपराष्ट्रपती जगदीप धनखड यांच्याबाबत अलीकडे निर्माण झालेली सार्वजनिक चर्चा ही केवळ एखाद्या व्यक्तीपुरती मर्यादित नसून, ती व्यापक अर्थाने संवैधानिक मर्यादा, तटस्थता आणि लोकशाही मूल्यांच्या संदर्भात महत्त्वपूर्ण ठरते. उपराष्ट्रपती हे भारतीय राज्यघटनेनुसार राष्ट्रपतींचे उत्तराधिकारी असण्याबरोबरच राज्यसभेचे पदसिद्ध सभापती असतात. या दुहेरी भूमिकेमुळे त्यांच्या पदाचे महत्त्व अधिक वाढते. सभापती म्हणून ते संसदेच्या उच्च सभागृहाचे संचालन करतात. त्यामुळे त्यांच्या प्रत्येक कृतीत तटस्थता, संयम आणि न्यायतेचा प्रत्यय येणे अपेक्षित असते. सभागृहातील विविध पक्षांना समान संधी देणे, चर्चेची गुणवत्ता टिकवून ठेवणे, नियमांचे पालन सुनिश्चित करणे आणि वादग्रस्त प्रसंगी संतुलित निर्णय घेणे. या सर्व जबाबदाऱ्या पार पाडताना सभापतींनी कोणत्याही प्रकारच्या पक्षीय किंवा वैचारिक प्रभावापासून दूर राहणे अत्यावश्यक असते. भारतीय राज्यघटना ही केवळ कायदेशीर चौकट नसून ती सामाजिक, राजकीय आणि नैतिक मूल्यांची सांगड घालणारी एक जिवंत दस्तऐवज आहे. या राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ‘संवैधानिक नैतिकता’ या संकल्पनेवर विशेष भर दिला होता. त्यांच्या मते, कोणत्याही संवैधानिक पदावर असलेल्या व्यक्तीने आपल्या वैयक्तिक विचारसरणीपेक्षा संविधानातील मूल्यांना प्राधान्य दिले पाहिजे. हीच भूमिका लोकशाहीच्या सुदृढतेसाठी अत्यावश्यक आहे. अलीकडे राष्ट्रीय स्वयंसेवक संघच्या एका कार्यक्रमात उपराष्ट्रपतींच्या उपस्थितीमुळे सार्वजनिक चर्चेला उधाण आले आहे. लोकशाही व्यवस्थेत प्रत्येक नागरिकाला विचारस्वातंत्र्य आहे आणि कोणत्याही कार्यक्रमात सहभागी होण्याचा अधिकार आहे. मात्र, जेव्हा एखादी व्यक्ती सर्वोच्च संवैधानिक पदावर असते, तेव्हा तिच्या वैयक्तिक कृतींचा परिणाम संस्थात्मक विश्वासार्हतेवर होतो. त्यामुळे अशा सहभागाकडे केवळ वैयक्तिक दृष्टिकोनातून पाहता येत नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एक प्रभावशाली सामाजिक-सांस्कृतिक संघटना आहे, परंतु तिच्याबद्दल समाजात विविध मतप्रवाह आहेत. काहींसाठी ती राष्ट्रभक्तीची प्रेरणा आहे, तर काहींसाठी ती विशिष्ट विचारसरणीचे प्रतिनिधित्व करणारी संस्था आहे. अशा परिस्थितीत उपराष्ट्रपतींसारख्या तटस्थ पदावरील व्यक्तीने अशा कार्यक्रमात सहभाग घेतल्यास, त्यांच्या तटस्थतेबद्दल प्रश्न निर्माण होणे स्वाभाविक ठरते. येथे मुद्दा केवळ सहभागाचा नसून त्या सहभागामुळे निर्माण होणाऱ्या संदेशाचा आहे. लोकशाही व्यवस्थेत विश्वास हा सर्वात मोठा आधार असतो. संसदेच्या कामकाजात विरोधी पक्षांचा विश्वास टिकवून ठेवणे हे सभापतींच्या भूमिकेचे केंद्रबिंदू आहे. जर विरोधी पक्षांना असे वाटले की सभापती विशिष्ट विचारसरणीकडे झुकलेले आहेत, तर संसदीय प्रक्रियेत अडथळे निर्माण होऊ शकतात. चर्चेचा दर्जा घसरू शकतो आणि लोकशाहीच्या मूलभूत तत्वांवर परिणाम होऊ शकतो. याशिवाय, अशा घटनांमुळे सामान्य नागरिकांमध्येही संभ्रम निर्माण होतो. लोकशाहीतील संस्थांवर असलेला विश्वास हा केवळ कायद्याने नव्हे, तर त्या संस्थांच्या वर्तनातून निर्माण होतो. जर संवैधानिक पदावरील व्यक्तींच्या कृतींमुळे पक्षपाताचा आभास निर्माण झाला, तर लोकांच्या मनात त्या संस्थांबद्दल शंका निर्माण होऊ शकते. हे लोकशाहीसाठी धोकादायक संकेत आहेत. भारतातील लोकशाही ही विविधतेवर आधारित आहे. विविध धर्म, भाषा, संस्कृती आणि विचारसरणी असलेल्या लोकांचा हा देश आहे. अशा परिस्थितीत संवैधानिक पदावरील व्यक्तींनी सर्व घटकांना समानतेने वागवणे आणि सर्वसमावेशक दृष्टिकोन ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. ‘राष्ट्र प्रथम’ ही संकल्पना तेव्हाच अर्थपूर्ण ठरते, जेव्हा ती कोणत्याही एका विचारसरणीपुरती मर्यादित न राहता संपूर्ण संविधानिक मूल्यांच्या चौकटीतून व्यक्त होते. याचा अर्थ असा नाही की उपराष्ट्रपती किंवा इतर संवैधानिक पदावरील व्यक्तींनी सार्वजनिक जीवनापासून पूर्णपणे अलिप्त राहावे. मात्र, त्यांच्या प्रत्येक कृतीत संतुलन, विवेकबुद्धी आणि दूरदृष्टी असणे आवश्यक आहे. त्यांनी घेतलेले निर्णय आणि केलेल्या कृती या केवळ वर्तमानापुरत्या मर्यादित नसून, त्या भविष्यातील परंपराही घडवतात. आजच्या काळात माध्यमे आणि सामाजिक माध्यमे यामुळे कोणतीही घटना क्षणार्धात चर्चेचा विषय बनते. त्यामुळे संवैधानिक पदावरील व्यक्तींनी अधिक सजग राहण्याची गरज आहे. त्यांच्या कृतींचे अर्थ लावले जातात, त्यावर चर्चा होते आणि त्यातून सार्वजनिक मत तयार होते. त्यामुळे तटस्थतेचे पालन करणे ही केवळ नैतिक जबाबदारी नसून, ती लोकशाही टिकवण्यासाठी आवश्यक अट आहे. शेवटी, संवैधानिक पदाची प्रतिष्ठा ही वैयक्तिक विचारांपेक्षा मोठी असते. उपराष्ट्रपती हे केवळ एक व्यक्ती नसून ते एक संस्था आहेत. त्यांच्या वर्तनातून संपूर्ण लोकशाही व्यवस्थेचा आरसा दिसतो. म्हणूनच, त्यांनी घेतलेल्या प्रत्येक पावलात संविधाननिष्ठा, तटस्थता आणि सर्वसमावेशकता यांचा प्रत्यय येणे आवश्यक आहे. लोकशाही मजबूत ठेवायची असेल, तर केवळ कायदे पुरेसे नसतात; त्यासाठी त्या कायद्यांचे पालन करणाऱ्या व्यक्तींची नैतिकता आणि तटस्थता महत्त्वाची असते. उपराष्ट्रपतींसारख्या उच्च पदावरील व्यक्तींनी या मूल्यांचे पालन केले, तरच भारतीय लोकशाही अधिक सक्षम आणि विश्वासार्ह राहील. ■ ■

# लंपट ज्योतिषाचा राजकीय झंटा-फंटा!

‘दुनिया झुकती है, झुकानेवाला चाहिए’ हे नाशिकचा लिंगपिसाट ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात प्रकरणाने पुन्हा दाखवून दिलेय. अशाच्या बदकर्मी धंद्याचे मार्केटिंग ‘महाराष्ट्र राज्य महिला आयोग’च्या अध्यक्ष रुपाली चाकणकर यांनी करावे, यात धक्कादायक काही नाही. ही युतीदेखील नवी नाही. थोर कवयित्री बहिणाबाई चौधरी (जन्म : 24 ऑगस्ट 1880; निधन : 3 डिसेंबर 1951) या निरक्षर होत्या. पण त्यांच्याकडे अद्भुत प्रतिभा, मर्मभेदी दृष्टी आणि विलक्षण समाजभान होते. म्हणूनच त्यांनी ठणकावून सांगितलेय -

*नको नको रे ज्योतिषा। माझ्या दारी नको येऊ।*
*माझे दैव मला कळे। माझा हात नको पाहू॥1*
*म्हणे नशिबाचे नऊ ग्रह। तळहाताच्या रेघोट्या।*
*बापा नको मारू थापा। अशा उगा खऱ्या खोट्या॥2*

अशा खणखणीत शब्दांत बहिणाबाईंनी दारी आलेल्या ज्योतिष्याला हाकललेय. याउलट, ज्याला महिला लैंगिक शोषणाच्या प्रकरणात त्या कॅप्टन अशोक खरात या ज्योतिष्याला नाशिक पोलिसांनी अटक केले; त्याच्या दारी सुशिक्षित, मान्यवर मंडळी जायची. त्याच्या दर्शन-मार्गदर्शनासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राधाकृष्ण विखे, दादा भुसे यांच्यासह आठ मंत्री नाशिकला अशोक खरातच्या मंदिर-आश्रमात जायचे. त्याच्या डोक्यावर छत्री धरलेले ‘राज्य महिला आयोग’ अध्यक्ष रुपाली चाकणकर आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या भेटीचे फोटो ‘सोशल मीडिया’ तून व्हायरल झाले आहेत. या नराधमाला अटक करताना पोलिसांनी जे पेनड्राइव्ह जप्त केले; त्यात 58 महिलांच्या लैंगिक शोषणाचा मुद्देमाल सापडलाय. तोही त्याचा ‘ऑफिस बॉय’ संशयित नीरज जाधव याने पैशाच्या लालचेपायी अशोक खरातला ब्लॅकमेलिंग (5 कोटी रुपये) केल्याने उघड्यावर आलाय.




त्र्यंबकेश्वर-नाशिक येथे दर 12 वर्षांनी होणाऱ्या ‘सिंहस्थ’ कुंभमेळ्याला 31 ऑक्टोबर 2026 पासून प्रारंभ होत आहे. हा कुंभमेळा 45 अमृत (शाही) स्नानांसह दीड वर्ष चालेल. त्यातील भोंदूगिरीचा हा भयानक ‘ट्रीझर’ ज्योतिषी अशोक खरात आणि पारनेर (जिल्हा : अहिल्यानगर) येथील 18 वर्षांच्या मुलीला तिच्या आई- वडिलांचा, भावाचा खून करण्याची धमकी देऊन गेली 5 वर्षे लैंगिक अत्याचार करणाऱ्या वारकरी बुवा हभप अण्णा गुंजाळ या कीर्तनकाराने दाखवला आहे. स्वतःला संत, महंत, साधू, बुवा-महाराज आणि ज्योतिषी म्हणून घेणारी ही मंडळी एकाच माळेचे मणी आहेत. या साऱ्यांचीच छिनाल छाप वेद, उपनिषद आणि पुराण कथांवर असते. सापडत नाहीत, तोपर्यंत हे ‘संधिसाधू’च असतात. हे तांदळातल्या खड्यांसारखे आहे. हे खडे निवडेपर्यंत तांदळाच्या पोत्यात तांदूळ म्हणूनच असतात. असाच ज्योतिषी अशोक खरात होता. तो स्वतःला ‘अंकशास्त्रज्ञ’ (न्यूमरोलॉजिस्ट) आणि ‘कॅप्टन’ म्हणवून घ्यायचा. ‘मर्चंट नेव्ही’ मधून अधिकारी म्हणून आपण निवृत्त झाल्याचे सांगायचा. या खोट्या ओळखीचा वापर करून त्याने स्वतःला बड्या राजकीय नेत्यांशी जोडून लोकांचा विश्वास संपादन केला होता. हा भोंदूगिरीचा ‘झंटा’ आणि त्यात ‘मी कृष्ण, तू राधा’ म्हणत होणारा महिलांच्या लैंगिक शोषणाचा ‘फंटा’ नवा नाही. ( हे ‘झंटा- फंटा’ शब्द बीड जिल्ह्यातील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणात ‘भाजप’ आमदार सुरेश धस यांनी जोरदारपणे वापरले होते. ) आठ वर्षांपूर्वी अमरावतीतील पूर्णा नदीकाठच्या नृसिंह मठाचा प्रमुख ‘बालयोगी ब्रम्हचारी महाराज’ (मूळनाव : मुरलीधर तायडे) सेक्स-सीडीमध्ये सापडला होता. त्याने बाथरूमचा ‘भोगखाना’ बनवला होता. अशा ‘लिंगपिसाट’ महाराजांपैकी कोल्हापूरचा तोडकर महाराज रंगेहाथ पब्लिकच्या तावडीत सापडला होता. (जानेवारी 2005) शिवलिंग महादेव तोडकर हा ‘महाराष्ट्र राज्य वीज महामंडळ’ (एमएसईबी)मध्ये कारकून होता. त्याची भविष्य कथनाची पद्धत अंकाशास्त्राशी संबंधित नसली तरी आकड्यांशी होती. त्याच्या येणाऱ्या गिऱ्हाईकाने जन्मकुंडली स्वतःच्या हातात ठेवायची. त्याला तोडकर महाराज एक संख्या मनात धरण्यास सांगे. ती धरल्याचे गिऱ्हाईकाने सांगितले की, तोडकर महाराज त्या संख्येतून 17 वजा करण्यास सांगायचा. त्यानंतर येणाऱ्या संख्येला 9 ने गुणायचे. जो गुणाकार यायचा; तो आकडा गिऱ्हाईकाने सांगताच, तोडकर महाराज म्हणायचा, ‘तीच तुझी जन्मतारीख!’ अशाच प्रकारे मुंबईतील कुर्ला येथील कर्वे गुरुजी आणि त्यांची मुलगी पिंकी, हे केवळ चेहरा पाहून भविष्य विचारायला येणाऱ्याची जन्मतारीख सांगत. अर्थात, ही पहिल्याच झटक्यात गिऱ्हाईक पक्के करण्याची ट्रिक होती. या जोरावर तोडकर महाराजने प्रचंड माया जमवली. वीज मंडळाच्या कारकूनाला ज्योतिष विचारायला वीजमंत्री यायचा. कोल्हापुरात कोणी बडा राजकीय नेता, कलावंत, प्रशासकीय अधिकारी आला की, त्यांना महाराजांचे चमचे-नमते महाराजांच्या सिद्धी-चमत्काराच्या करामती ऐकवून त्यास गंजीमाळ परिसरातील ‘द्रोणागिरी’ आश्रमात नेत. त्यापैकी काहींना तोडकर पदव्या-उपाध्या देऊन आपले करीत. अशाप्रकारे गळाला लागलेले भक्त तोडकर महाराजाला आपल्या संस्था-संघटनेच्या कार्यक्रमासाठी मुंबई-पुण्याला नेत. त्यावेळी महाराजांबरोबर विमानातून जाण्यासाठी बड्या-श्रीमंत भक्तांमध्ये चढाओढ लागायची. या साऱ्या बनावामुळे तोडकर महाराज कोल्हापूरच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनाचे मानचिन्ह झाला होता. परंतु, वसई-भाईंदर येथून भविष्य समजून घेण्यासाठी कोल्हापुरात आलेल्या दोन तरुणींनी आश्रमातल्या ‘खास खोली’ तील तोडकर महाराजाचे अश्लील उद्योग जगजाहिर केले. त्याची पोलीस ठाण्यात रीतसर तक्रार दाखल केली. त्यातून कोल्हापुरात तोडकर महाराजाविरोधात लोकांदोलन उभे राहिले.



ज्ञानेश महाराव

पोलीस त्याला जामिनासाठी कोर्टात नेत असताना, लोकांनी चपलेने बडवले. बम्हचारी हनुमंताच्या आडोशाने लैंगिक खेळ खेळणाऱ्या तोडकर महाराजचे थोबाड हुप्प्या वानर दिसावा, इतके सुजवले. त्याच्या केसचा निकाल तो मरेपर्यंत (5 फेब्रूवारी 2015) लागला नाही. त्याचा मात्र आश्रम अजूनही आहे. 1991 मध्ये नागपुरातील एका भक्ताच्या मुलीवर बलात्कार करणारा कृपाळू महाराज, त्या गुन्ह्याबद्दल 7 वर्षांची शिक्षा भोगून तुरुंगातून बाहेर आला आणि ‘आस्था’ आणि ‘संस्कार’ टीव्ही चॅनलवरून प्रवचने देऊ लागला. अंगावर जिवंत साप घेऊन ‘नागीन डान्स’ साठी प्रसिद्ध असणाऱ्या स्वामी भीमानंद याला प्रवचनाला येणाऱ्या मुलींना ‘सेक्स रॅकेट’ मध्ये फसवल्याच्या आरोपाखाली (2010 मध्ये) अटक झाली होती. बंगळूरचा स्वामी नित्यानंद यालाही तमिळ अभिनेत्री बरोबरचा सेक्स व्हिडिओ ‘लीक’ केला म्हणून पोलिसांनी अटक केली होती. अशाचप्रकारे दोन मुलींवर बलात्कार केल्याच्या आरोपाखाली आसाराम बापू जेलबंद झाला. (2013) सोबत, त्याचा मुलगा नारायण साई हादेखील सुरतमधील दोन मुलींवर (दोघी बहिणी होत्या.) बलात्कार केल्याच्या आरोपाखाली जेलबंद झाला. तरीही आसाराम बापूच्या देशभरातील शेकडो आश्रमांपैकी एकाचीही वीट हलली नाही. या नाकर्तेपणाची पैदास ‘जे जे होईल, ते पहावे; चर्चा करावी आणि गप्प बसावे,’ या सामाजिक षंढपणातून झाली आहे.

क्रमशः ■ ■

# आंबेडकरी चळवळीला समर्पित व्यक्तिमत्व
# प्रा. घनश्याम धाबर्डे



बहुजन सौरभ

***आंबेडकरी चळवळीत सक्रिय असणारे नागपुरातील काही ख्यातकीर्त व्यक्ती आहेत. त्यापैकी एक व्यक्तिमत्व म्हणजे प्रा. घनश्याम धाबर्डे ! कोणतेही आंबेडकरी संघटन असो, एकत्रित ठेवण्यासाठी धडपडणारे, समाज कार्यात अग्रेसर असणारे, धम्मकार्यात आदर्शवत प्रा. घनश्याम धाबर्डे हे बहुतेकांना सुपरिचित आहेत.***

मनाची विनम्रता, दुःखीकष्टी लोकांप्रती करुणा, सहानुभूती आणि आपुलकीच्या वागणूकीमुळे प्रा. धाबर्डे आंबेडकरी समाजाच्या गळ्यातील ताईत बनले आहेत. बुद्धांची करुणा, मैत्री आणि बंधुतेच्या आचरणातून ते सतत धम्म जीवन जगत आहेत. कुणाच्या भावना न दुखवता निर्णयक्षमता, स्पष्टपणा जोपासणारे व्यक्ति म्हणून त्यांची ख्याती आहे. महाविद्यालयीन शिक्षणापासून ते विविध सामाजिक संघटनेत कार्य करता ते परिपक्व होत गेले. जैसेथेवादी व्यवस्थापन असलेल्या लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी येथे प्राध्यापक असले तरी क्रांतीकारक आंबेडकरी कार्यात कुठे कमी पडले नाही. नोकरी सांभाळून ज्ञानदानाच्या कार्यात संघर्षाची जोड देऊन आंबेडकरी चळवळीत शेवटपर्यंत सक्रिय राहिले. त्यांनी या कार्यात संघटन कौशल्य, वैचारिक बांधिलकी आणि शिस्त याची सांगड घालून दिली. वणी येथे नोकरीत असतांना जनसामान्यांसाठी पतसंस्था, ‘निर्गुडा समाचार’ व ‘बहुजन मुक्ती संग्राम’ हे साप्ताहिक सुरू केले. प्रा. धाबर्डे यांनी कधीही पदाची लालसा ठेवली नाही. पण त्यांनी बहुजन समाज पार्टीच्या यवतमाळ जिल्हा संघटनेची बांधणी केली. या परिसरात त्यांनी मागासवर्गीय मुलांसाठी ‘सिद्धार्थ वस्तीगृह’ चालवले, जे अजूनही उत्तम प्रकारे कार्यरत आहे. प्रगल्भ व्यक्तिमत्वामुळे ते आंबेडकरी चळवळीसाठी सतत मार्गदर्शक ठरले आहे. सेवानिवृती नंतर नागपुरात स्थायिक झाले असून त्यांची काळजी घेणारी त्यांची कन्या डॉ. प्रेरणा आणि जावाई डॉ.महेंद्र कांबळे वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत आहेत. 2017 साली लेखकाच्या निवासस्थानी साप्ताहिक सभेच्या धम्मसंगोष्टीची बीजे रोवली गेली. त्यातील प्रा. धाबर्डे धम्मसंगोष्टीचे संस्थापक सदस्य होते आणि आजही ते प्रत्येक सभेच्या आयोजनात मार्गदर्शकाच्या भूमिकेत असतात. कोरोना काळात धम्मसंगोष्टी जवळपास 3 महीने बंद होती. काहींच्या सूचना होत्या कि धम्मसंगोष्टी यापुढे बंद करावी. त्याप्रसंगी प्रा. धाबर्डे, सुधाकर दुबे यांनी धम्मसंगोष्टी बंद करू नये अशी भूमिका घेतली. आज धम्मसंगोष्टी ज्ञानवृक्ष बनला आहे, त्याचे श्रेय प्रा. धाबर्डे यांना नक्की जाते. धम्मसंगोष्टी असो वा अन्य कार्यात हिरीरीने सहभाग नोंदवून कोणत्याही विषयावर दिशादर्शक विचार देणारे प्रा. धाबर्डे हे वैचारिक बांधिलकी जपणारे व्यक्तीमत्व आहे. धम्म संगोष्टी शिवाय ते बहुजन मैत्री संघ, सम्यक संकल्प संघ, बुद्ध विहार समन्वय समिती आणि विविध संघटनेत कार्यरत आहेत. बुद्ध विहार समन्वय समितीमध्ये राष्ट्रीय स्तरावर परिषदा आयोजित करण्यात सरांचा सिंहाचा वाटा असतो. त्यांनी 2025 मध्ये डॉ.सुशील मेश्राम यांच्या मार्गदर्शनात देहदान, अवयवदान अभियान राबवले. या अभियानात त्यांनी एकाच वेळी 75 लोकांचे देहदान संकल्प पत्र भरून कीर्तिमान स्थापित केला. या प्रसंगी त्यांनी स्वतःचे आणि त्यांच्या सहचारिणी शशीकला धाबर्डे यांच्या देहदानाचे संकल्पपत्र भरून दिले होते. त्या नुसार धाबर्डे सरांनी स्मृतीशेष शशीताईंचे डोळे महात्मे नेत्र पीढीला आणि देहदान तस्ष्ट ला दान करून शशीताईंची दानपारमिता आणि संकल्प पूर्णत्वास नेली. शशि ताईंचे गृह व्यवस्थापन प्रा. घनश्याम धाबर्डे यांच्या कार्यास दृढ करणारे आधारवड ठरले होते. त्यांच्या कार्य-कृतीवरून त्यांच्यात ‘बोले तैसा चाले’ ही विशेषता लक्षात येते. त्यांच्या 75 वर्षाचा अनुभव, प्रेम आणि मार्गदर्शनाचा अमूल्य ठेवा आम्हा सर्वांना सतत प्रेरणादायी राहणार आहे. प्रा. धाबर्डे यांच्या जीवनात एक बाब निश्चित लक्षात घेण्याजोगी आहे, ती म्हणजे ‘कामासाठी वय नाही तर उत्साह आणि इच्छा असावी’ लागते. प्रा. धाबर्डे यांच्या डायमंड ज्युबिली दिनानिमित्त धम्मसंगोष्टी, सम्यक संकल्प संघ, बहुजन मैत्री संघ, बुद्ध विहार समन्वय समिती तर्फे त्यांच्या कार्यास खूप खूप शुभेच्छा. येणारा प्रत्येक क्षण तुमच्यासाठी आनंदात जावो आणि आपणास दीर्घायुष्य लाभो ही मंगल कामना !! ■ ■



श्रीराम बनसोड,
8208617748

## वाचकांचे विचारपिठ

बहुजन सौरभ

### अभिनंदन!

बहुजन सौरभ मधील ‘आंबेडकरी दृष्टीने AI संकट’ हा उत्कृष्ट असा संपादकीय लेख लिहिला आहे. प्रस्तुत लेखात आंबेडकरवाद आणि बुद्ध धम्मातील विचारांच्या दृष्टिकोनातून विवेचन केले आहे. लेखाच्या शेवटी असा निष्कर्ष मांडण्यात आला की, भारताचे भविष्य हे कृत्रिम बुद्धिमत्तेमध्ये नाही तर ते आर्थिक रचनेत आहे. अतिशय सुंदर संपादकीय लिहिल्याबद्दल निवासी संपादिका संध्या राजुरकर यांचे हार्दिक हार्दिक अभिनंदन.

**- डॉ. प्रदीप आगलावे**

दि.27 फेब्रुवारी 2027 ‘दै.बहुजन सौरभ’ मधील संपादकीय ‘आंबेडकरी दृष्टिने AI संकट’ मधून अतिशय दूरदृष्टीची भविष्यातील धोक्याची घंटी प्रतिपादित केली आहे. पूर्वी इंग्रजांना व्यापार करण्यासाठी भारतात यावे लागले होते. आता अमेरिका, फ्रांस, ब्राजील तोच मुक्त व्यापार मोठ्या प्रमाणात करत आहेत. गुलामीचा फास निश्चितच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या ‘State Socialism’ विरोधी आहे. AI च्या माध्यमातून धार्मिक गुलामगिरी सुद्धा मोठ्या प्रमाणात सुरु आहे, ती 1956 च्या धम्मक्रांती विरूद्ध निश्चितच आहे.

**- पुरूषोत्तम संबोध**

दिवंगत रणजीत मेश्राम सर, डॉ. जनार्दन वाघमारे यांना आदरांजलीपर लेख छान व अभ्यासपूर्ण आहेत. आचार्य दीनबंधू गुरूजी यांचे जन्मशताब्दी वर्षानिमित्त लिहिलेल्या लेखावर डॉ. के. पी. वासनिक यांनी प्रतिक्रिया देऊन माझे अभिनंदन केले. आपला दैनिक बहुजन सौरभ खूप दूरवर जातो याचा रास्त अभिमान आहे. आपला स्नेह आहेच तो अधिकाधिक वृद्धिंगत व्हावा हीच सदिच्छा...पुन्हा आपले खूप खूप आभार...!

**- डॉ. एम. आर. इंगळे**

बहुजन सौरभने रणजित भैयाला न्याय दिला. संपादक सिद्धार्थ, संध्या आणि टिमचे मन:पूर्वक आभार.

**- जयंत नरांजे**

रणजीत मेश्राम सरांच्या कार्यकर्तृत्वाला दैनिक बहुजन सौरभने सरांच्या वैचारिक धाटणीतून समर्पक न्याय दिलेला आहे, अभिनंदन!

**- डॉ. विणा राऊत**

संपादक प्रा. संध्या राजूरकर यांचा, मराठी भाषा गौरव दिनाच्या अनुषंगाने आलेला लेख हा वस्तुस्थिती ला धरून असून योग्य संदेश देणारा आहे. मंगल कामना. अभिनंदन!

**- अविनाश टिपले**

आपण मराठी भाषा दिवस वर लिहिलेला लेख वस्तु:स्थिती व परिस्थितीजन्य वास्तव असून मांडलेले विचार अत्यंत समर्पक आहेत. आपले मनापासून अभिनंदन! ■ ■

**- अनिल कुमार पालीवाल**

## समाज व देशाच्या वैचारिक उर्जेचे स्रोत
# भीम रसायन

धर्मांधतेला अनन्य साधारण महत्व दिले. देशात अंधश्रद्धेसाठी एक नव्हे 33 कोटी काल्पनिक देवी-देवता प्रसवल्या. बाह्यशक्ती लावल्याशिवाय समोर ठेवलेला भाजला पापड तोडता येत नाही तरी धर्मांध होऊन देश व समाज काल्पनिक देवादिकांच्या अधीन केला, परावलंबी केला. भारतीय समाजात अंतर्गत फूट पाडली. समाजाला फोडा, झोडा त्यावर राज करा हे तत्व अंमलात आणले. हेच तत्व इंग्रजांनी ब्राम्हणांकडून हायज्याक करून भारतीयावर चालवले. ब्राम्हणांनी राजे, महाराजांवर धर्माचा वर्चस्व प्रस्थापित केला. देश व समाजाची सुरक्षा ब्राम्हणांना महत्वाची वाटली नाही. प्रचंड लोकसंख्येचा देश ब्राम्हणांनी असुरक्षित केला. हिंदू धर्मावर भटांनी पकड मजबूत केली.

चक्रवर्ती महान सम्राट अशोकाच्या मौर्य काळात (जंबूद्विप) भारत देशाची ओळख सोनेकी चिडीया नावाने होती. राष्ट्र सुजलाम सुफलाम, सुखी, समृद्ध होते. बौद्धकालीन नालंदा, तक्षशिला, विक्रमशिला सारखे 15-16 जागतिक किर्तीचे विश्व विद्यापीठ होते. (देशात आज जागतिक किर्तीचे एकही विद्यापीठ नाही) शिक्षण सर्वांना खुले होते. परदेशी विद्यार्थी शिक्षणासाठी भारतात यायचे 8-10 हजार विद्यार्थी, एकत्र शिकतील अशी विद्यापीठात शिक्षणाची सोय होती.

अखेरचा बौद्ध मौर्य सम्राट जयद्रथाचा खून त्याचा ब्राम्हण सेनापती पुष्पमित्र शुंगाने कपटाने केला. ब्राम्हणांच्या दुष्कृत्याने देशाला उतरती कळा लागली. ब्राम्हणी तत्वज्ञान समाज व राष्ट्र विकासाचे नसून फक्त ब्राम्हण समाजाच्या स्वार्थाचे आहे. देशावर ब्राम्हणांची धर्मसत्ता असताना त्यांनी देश वाऱ्यावर सोडला. देशाच्या सुरक्षेकडे बुद्धीपुरस्सर दुर्लक्ष केला संधी साधून भारतावर परकीयांनी स्वाऱ्या केल्या. अल्प संख्येतील क्षत्रीय मुकाबला करू शकले नाही. देश रक्षणासाठी हातात शस्त्र घेणे इतरांना वर्ज्य होते. धर्मांधांना यांची लाज वाटली नाही.

अनेक तत्वज भारतीयांनी या विरुद्ध आवाज उठवला. पण कोणीही हिंदू धर्मग्रंथांना ओलांडून पुढे गेला नाही. रुढी परंपरे पलिकडे जाण्यास व परिवर्तन स्वीकारण्यास हिंदू धर्मात सक्त मनाई होती व आहे.



बहुजन सौरभ

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी गुलामीतून समाज व राष्ट्र मुक्तीसाठी मानवतावादी दृष्टिकोन स्वीकारला. बहुजन समाज जागवला इतरासारखे आपणही आहोत ही भावना वृद्धिंगत केली. स्वसंरक्षणासाठी समाज सिद्ध केला. समाजात समता प्रस्थापित केली. शिक्षणाची दारे सर्वांसाठी खुली केली. शिक्षणामुळे हिंदूधर्मातील फसवेगिरी, गुलामगिरी, रुढी-परंपरा उघड झाली. सामाजिक स्वातंत्र्यासह राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी पुरोगामी म्हणविणाऱ्या ब्रिटिशांचीही कान उघाडणी केली. निडर होऊन युक्तिवाद करताना म्हटले, ‘भारत देशावर ब्रिटिश सरकारने 150 वर्षे राज्य करताना प्रजेच्या सुखसोयीकडे दुर्लक्ष केला. बहुजन समाज हिंदू धर्माचा तसेच तथाकथित सवर्णांच्या गुलाम राहिला हे सरकारचे पुरोगामित्व कसे?’ डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी प्रजेच्या बळावर गोलमेज परिषद गाजवली. ब्रिटिश कमिशनांपुढे देशाच्या स्वातंत्र्यासह सामाजिक स्वातंत्र्याची शास्त्रशुद्ध मांडणी केली. देशातील मनुवादी हिंदू पुढाऱ्यांनी सामाजिक समतेचा कट्टर विरोध केला. दलित, अस्पृश्य, बहिष्कृतांना मानवी अधिकार देण्यास दलितांवर होणारे अत्याचार बंद करण्यास, हिंदू धर्मग्रंथातील न पटणाऱ्या गोष्टी, कोडे काढण्यास विरोध केला. अखेर दुःखी, कष्टी मनाने डॉ. बाबासाहेबांनी 1935 ला नाशिकच्या येवले परिषदेत हिंदू धर्माचा त्याग करण्याची घोषणा केली. 21 वर्षे बदलांची अपेक्षा केली. अखेर 1956 ला नागपूरच्या दीक्षाभूमीवर महाकारुणीक तथागत बुद्धांच्या मानवतावादी बुद्ध धम्माचा स्वीकार करून भदंत महायेरो चंद्रमणीच्या आज्ञेने 7 (सात) लक्ष अनुयायांना बुद्ध धम्माची दीक्षा दिली. अस्पृश्यांना दुसरा जन्म मिळाला. ते हिंदू जोखडातून मुक्त झाले. त्यांना दलदलीतून, नर्ककुंडातून मुक्ती मिळाली. हा प्रसंग जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरला गेला. या घटनेमागे महाडच्या पाण्याचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर प्रवेश, पुणे-पॅक्ट, हिंदू-कोडबील वगैरे प्रसंग आहेत. डॉ. बाबासाहेबांनी जनजागरणासाठी वृत्तपत्रे चालवलेली पिपल्स एज्युकेशन सोसायटी, संविधान निर्मिती, राष्ट्रीय प्रवाहात येण्यासाठी, समानता प्रस्थापित होण्यासाठी संविधानात आरक्षणाची तरतूद केली. संविधानातून सर्वांना एका मताचा समान अधिकार, स्त्री-पुरुष समानता, सर्वांना शिक्षणाची समान संधी दिली. भारतीयांना राष्ट्रभक्तीशी जोडले, भारत देश माझा ही भावना विकसित केली. देशाच्या सुरक्षेसाठी आता केवळ क्षत्रिय जबाबदार नाहीत देशाचा प्रत्येक नागरिक देश रक्षणासाठी प्रसंगी शत्रूवर तुटून पडेल ही मानसिकता संविधानाने निर्माण केली. बुद्धाच्या भिक्षु संघातील लोकशाही देशात प्रस्थापित केली. संविधानाच्या बळावर विज्ञान, तंत्रज्ञान, परिवर्तनाच्या दिशेने देशाने आगेकूच केली. बुद्धाच्या ‘अत्त दिप भवं’ने समाज स्वयं प्रकाशित झाला. देश जागृत झाले. देश संघटित झाले. संविधान व संविधानकाराचा अवमान करणाऱ्या दुष्ट प्रवृत्तींना पळता भुई कमी पडेल त्यांनी सावध व्हावे. भीम रसायन देशभर नव्हे जगभर पोहोचले. देशात डॉ. बाबासाहेबांचे नाव व त्यांचा ध्वज राजकीय पक्षांना अपरिहार्य झाले. भीम रसायन प्रचंड उर्जेचे स्रोत झाले. या रसायनातून संयम, मैत्री, करुणा, प्रजा, विस्वास, स्वावलंबी, वैज्ञानिकदृष्टी, परिवर्तनाचे प्रवाह वाहतात. हे रसायन शिलाचाराने प्रामाणिक जीवन जगायाचे स्वयं निर्यायाचे, स्वयं निर्भय होण्याचे धाडस देते. भीम रसायन सर्वांसाठी आहे. जो प्राषण करतो तो अधिकाराने डरकाळी फोडतो. ■ ■

विद्या व्यासंग



प्राचार्य भाऊ वासनिक
मो. 9423606064

# गुद द्वाराशी संबंधित आजार
# ( Anorectal diseases)

Anorectal डिसीजेस म्हणजे गुद (Anus) आणि मलाशय (Rectum) या अवयवाशी संबंधित आजार होय. हे दोन्ही अवयव पचनसंस्थेची निगडित आहे आणि या अवयवाचे कार्य मल निसरण करणे हे होय. अनोरेक्टल डिसीजेस यालाच आपण सामान्य भाषेमध्ये मुळव्याध, भगंदर आणि फिस्टुला असे म्हणतो. हे आजार प्रामुख्याने चुकीची जीवनशैली, आहारामध्ये अनियमित्ता आणि सतत एका जागी बसून राहणे यामुळे होतात. या आजारामध्ये प्रामुख्याने गुद भागामध्ये सूज, वेदना, खाज येणे आणि मलनिस्सरण करतेवेळी रक्तस्त्राव होणे ही प्रमुख लक्षणे दिसतात. या आजारामध्ये रुग्ण लाज, भीती, संकोच किंवा अज्ञानामुळे डॉक्टरकडे जाण्यासाठी टाळाटाळ करतो. त्यामुळे पुढे जाऊन हा आजार गंभीर होतो. यामुळे रुग्णाला शारीरिक तसेच मानसिक त्रास होतो. म्हणून या आजारासंबंधीत समाजामध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. हे आजार पचन संस्थेशी निगडित आहेत.

अनोरेक्टल डिसीजेस म्हणजे काय?
गुदद्वार आणि मलाशय या भागामध्ये होणाऱ्या आजारांना anorectal डिसीजेस असे म्हणतात. हे आजार प्रामुख्याने पचन बिघडल्यामुळे आणि बद्धकोष्ठता, व्यायामाचा अभाव यामुळे निर्माण होतात.

**अनोरेक्टल डिसीजेसचे प्रमुख प्रकार :-**

**1) मुळव्याध (पाइल्स) :-** मूळव्याध हा आजार सर्वात सामान्य आहे. यामध्ये गुद भागातील रक्तवाहिन्या यावर सूज येते आणि शौच करतेवेळी रक्तस्त्राव होतो. तसेच वेदना आणि खाज येते व कधी कधी त्या ठिकाणी रक्ताची गाठ तयार होते. बद्धकोष्ठता, गर्भावस्था, लठ्ठपणा आणि बैठी जीवनशैली ही या आजाराची प्रमुख कारणे आहेत.

**2) गुदद्वार वीदर (परिकर्तिका) Anal fissure :-** यामध्ये गुदद्वारातील त्वचेवर चीर किंवा भेगा किंवा छोटीशी जखम तयार होते यालाच अनाल फिशर असे म्हणतात. यामध्ये शौच करतेवेळी तीव्र वेदना तसेच चिरकांडी उडाल्यासारखा रक्तस्त्राव होतो आणि त्या जागी आग किंवा जळजळ होते. यामध्ये कडक मलप्रवृत्ती होते आणि खूप दिवसापासून बद्धकोष्ठतेचा त्रास असतो.

**3)भगंदर (Fistula) :-** गुदद्वाराच्या आसपास त्वचेखाली एक छोटासा मार्ग किंवा पोकळी तयार होते. यालाच भगंदर असे म्हणतात. यामध्ये गुद भागी सूज येणे, त्यामध्ये संक्रमण होऊन पुय निर्माण होते आणि वेदना व ताप येतो. याचे प्रमुख कारण गूदभागी संक्रमण हे आहे.



बहुजन सौरभ

**4) गुदभाग फोड (peri-anal abscess) :-** यामध्ये गुद भागाच्या आसपास संक्रमण होऊन तिथे फोड तयार होतो आणि त्यामध्ये पू तयार होतो. यामध्ये तीव्र वेदना, सूज आणि गुद द्वाराचा भाग लालसर होतो. ताप हे यामध्ये प्रमुख लक्षण असते. योग्य वेळी उपचार न केल्यास याचेच रूपांतर पुढे भगंदर यामध्ये होते.

**कारणे :-** ‘दीर्घकालीन बद्धकोष्ठता’ आहारामध्ये फायबर युक्त पदार्थांचा वापर न करणे, पाणी कमी पिणे, अति तिखट तेलकट व मसालेदार पदार्थ तसेच मांसाहार यांचा अतिवापर करणे, सतत एका जागी बसून काम करणे, व्यायामाचा अभाव, लठ्ठपणा.

**आजाराचे निदान :-** यामध्ये डॉक्टर रुग्णाची शारीरिक तपासणी करून तसेच गरज पडल्यास प्रोक्टोस्कोपी, कोलोनोस्पोपी आणि इतर तपासण्या करतात. यामुळे आजाराचे योग्य निदान होऊन उपचार करण्यास मदत होते.

**उपचार :-** यामध्ये प्रामुख्याने या आजाराची तीव्रता कशी आहे यावर उपचार ठरविल्या जातात. अगदी सुरुवातीच्या अवस्थेत औषधोपचार आणि जीवनशैलीमध्ये सकारात्मक केलेले बदल यामुळे रुग्णाला आराम होतो. यामध्ये प्रामुख्याने डॉक्टर वेदनाशामक औषधे, सूज कमी करणारी औषधे तसेच अँटिबायोटिक्स यांचा उपयोग करतात. गुदभागी जास्त वेदना असल्यास लोकल झायलोकेन क्रीम, लोकल अँटीसेप्टिक लोशन, मलम इत्यादी औषधांचा उपयोग केला जातो.

Sitz bath यामध्ये एका टब मध्ये गरम पाणी घेऊन त्यामध्ये अँटीसेप्टिक लोशन्स टाकून रुग्णाला दहा ते पंधरा मिनिटे त्या टब मध्ये बसायला सांगतात. यामुळे रुग्णाला वेदना कमी होण्यास मदत होते. मल मल मऊ करणारी औषधे जसे की क्रीमफिन लॅक्टुलोस इत्यादी. औषधे रात्री झोपण्यापूर्वी घेण्यास देतात आणि गरज पडल्यास शस्त्रक्रिया यामध्ये लेझर सर्जरी इत्यादी उपाय केल्या जातात. आयुर्वेदामध्ये क्षारसूत्र ही एक विशिष्ट चिकित्सा पद्धती आहे. ज्यामुळे या आजारामध्ये रुग्णाला आराम मिळतो.

**हा आजार होऊ नये यासाठी घ्यावयाची काळजी :-** जीवनशैलीमध्ये सकारात्मक बदल करणे. दररोज भरपूर पाणी पिणे. आहारामध्ये हिरव्या पालेभाज्या फळे आणि धान्य यांचा वापर करणे. नियमित व्यायाम योगासन करणे. शौचाच्या वेळा नियमित करणे. अति तिखट, तेलकट व मसालेदार पदार्थ, मांसाहार यांचा वापर बंद करणे.

हे आजार प्रामुख्याने जीवनशैलीशी संबंधित आहे. त्यामुळे योग्य आहार विहार, नियमित व्यायाम, योगासन तसेच बद्धकोष्ठता होऊ न देणे. यामुळे आपण या आजारापासून दूर राहू शकतो. बरेचदा रुग्ण या आजारामध्ये भीतीमुळे किंवा लाजेमुळे तसेच अज्ञानामुळे डॉक्टरकडे जाण्यास टाळाटाळ करतात. त्यामुळे हा आजार गंभीर रूप धारण करू शकतो. म्हणून सुरुवातीलाच लक्षणे दिसतात डॉक्टरकडे जाऊन उपचार केल्यास हा आजार लवकर बरा राहू शकतो.‘स्वस्थ रहा मस्त रहा.’ ■ ■

आरोग्यम् सुखसंपदा



डॉ. सूर्यकांता पाटील
मो. 9923338047

# महाडचा संगर : सामाजिक न्यायाचे चेतनापर्व

**20 मार्च 1927 रोजी महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या शताब्दी वर्षाला सुरुवात होत आहे. यानिमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकराना अभिप्रेत असलेली समताधिष्टीत समाजनिर्मिती झाली पाहिजे. सामाजिक लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय प्रस्थापित झाली तरच भारत देश अधिकाधिक प्रगतीशील राष्ट्र ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाच्या अंगिकारातूनच अनुयायांच्या सार्वजनिक जीवनाला नवा अन्वयार्थ प्राप्त होईल. आज, 20 मार्च ‘महाड संगर शताब्दी वर्षारंभा’च्या निमित्ताने...**

महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रह म्हणजे सामाजिक न्यायाच्या हुंकार घालणारे चेतनापर्व. महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलित-अस्पृश्यांना समतेची वागणूक मिळण्यासह त्यांना त्यांचे न्याय्य हक्क मिळवून देण्यासाठी आपले संपूर्ण आयुष्य खर्ची घातले. समाजासाठी स्वतःला वाहून घेणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे खऱ्या अर्थाने सामाजिक क्रांतीचे उद्गाते आहेत. महाड येथील चवदार तळ्याच्या सत्याग्रहाच्या शताब्दी महोत्सवी वर्षाला आज, 20 मार्च 2026 रोजी सुरुवात होत आहे. या शताब्दी वर्षाच्या निमित्ताने या घटनेच्या पार्श्वभूमीवर सामाजिक अभिसरणाच्या प्रक्रियेचे महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण होत आहे. ज्या दलित-अस्पृश्य समाजाला अज्ञान, दारिद्र्य, अवहेलनेच्या टप्प्यातून प्रवास करावा लागला. मोठ्या समाज घटकाची प्रतिष्ठा, त्यांचा स्वाभिमान नाकारला गेला. माणूस म्हणून असलेल्या त्यांच्या हक्कांवर निर्बंध लादले गेले. अशा बुर्जवा-संवेदनाहीन व्यवस्थेविरुद्ध महाड येथील मानवमुक्तीच्या लढ्यातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक रणशिंग फुंकले. कारण, निसर्गदत्त पाण्यावर अस्पृश्य समाजाचाही हक्क आहे, हा नैसर्गिक न्याय त्यांना अभिप्रेत होता. ज्या ‘नाही रे’ वर्गाचे प्रस्थापित समाजव्यवस्थेने मनुष्यत्व नाकारले,अशा विषम समाजव्यवस्थेविरुद्ध प्रतिकार करून अशा समाज घटकाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समता, न्याय, प्रतिष्ठा, नैतिकता प्रदान केली. तळागाळातील माणसात ऊर्जा पेरली. त्यामुळे ऊर्जावान माणसांची नाळ सामाजिक चळवळीत वृद्धिंगत झाली. वैचारिक, बौद्धिक क्षमता वाढली. महाडच्या सत्याग्रही संग्रामात वैश्विक मूल्यांची बीजे रुजली असल्यामुळे आंबेडकरी चेतनापर्व उभे राहिले. कारण विखारी विचरप्रवृत्तीने पाण्याचाच नव्हे; तर माणुसकी, समतेचाही अधिकार नाकारला होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू समाजाला शिडी नसल्याची भावना 31 जानेवारी 1920च्या ‘मूकनायक’ अंकाच्या पहिल्या अग्रलेखात उद्ध्वस्त करताना म्हटले की, ‘हिंदू समाज हा एक मनोरा आहे व एक एक जात म्हणजे त्याचा एक एक मजलाच आहे. पण लक्षात ठेवण्यासारखी गोष्ट आहे की, या मनोऱ्यास शिडी नाही आणि म्हणून एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर जाण्यास मार्ग नाही. ज्या मजल्यात ज्यांनी जन्मावे, त्याच मजल्यात त्यांनी मरावे - खालच्या मजल्यावरचा इसम, मग तो कितीही लायक असो, त्याला वरच्या मजल्यात प्रवेश नाही व वरच्या मजल्यातला




माणूस मग कितीही नालायक असो, त्याला खालच्या मजल्यात लोटून देण्याची कोणाची प्राज्ञा नाही.’ अशा चौकटीतल्या समाजात विषमतेला पालवी फुटेल नाही तर काय? या मनोऱ्याचा बुरूज ढासळल्याशिवाय गत्यंतर नाही. म्हणून हा शिर्षस्थानी असलेल्या मनोरा उद्ध्वस्त करण्याचा आग्रह डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धरला होता. महाड येथील चवदार तळ्यावर 20 मार्च 1927 रोजी सत्याग्रह केला. तत्कालीनच नव्हे तर आजच्याही परिस्थितीत सामाजिक न्यायाच्या संदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक जीवनातील पहिल्या पर्दापणाच्या दृष्टीने या घटनेला इतिहासात अनन्यसाधारण महत्त्व आहे. या घटनेच्या काही महिन्यानंतर 25 डिसेंबर 1927 रोजी ‘मनुस्मृती’ दहन करून धर्मसंस्था / धर्मपीठांना त्यांनी हादरा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या या धाडसी-कठोर निर्णायक भूमिकेमुळे दलित-अस्पृश्य समाजाला नवे बळ मिळाले. मानवमुक्तीसाठीच्या आंदोलनाच्या आशा प्रफुल्लित झाल्या. कुलाबा जिल्ह्यातील ‘बहिष्कृत हितकारणी’च्या सभेच्या अधिवेशनात 20 जुलै 1924 रोजी त्यांनी ‘शिका- संघटित व्हा-संघर्ष करा’ या ब्रिदवाक्याद्वारे मानवी मुक्तीसंग्रामाचा पट अधोरेखित केला. त्यामुळे दलित-अस्पृश्यांची वाटचाल सुकर झाली. समग्र जीवनसृष्टीला तारक-पोषक ठरले. अशा प्रेरणादायी ब्रीदवाक्यामुळे समाजजीवनात आत्मसन्मानाची नवी ऊर्जा संचारली. या ब्रिदवाक्यामुळे मानवशास्त्रीय, समाजशास्त्रीय दृष्टिकोनाचा पट विस्तृत झाला. ही वैश्विक मूल्यसिद्धांताची पायाभरणीच होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘बहिष्कृत भारत’ पाक्षिक सुरू केले. त्यामुळे दलित-अस्पृश्यांच्या सामाजिक चळवळीला गती प्राप्त झाली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ‘बहिष्कृत भारत’ पाक्षिकामध्ये दोन दीर्घ अग्रलेख लिहिले आहेत. हे अग्रलेख 22 एप्रिल 1927 आणि 2 मे 1927 रोजीच्या अंकांत प्रकाशित झाले आहेत. यातील पहिला अग्रलेख ‘महाड येथील धर्मसंगर व वरिष्ठ हिंदूची जबाबदारी’ तर दुसरा अग्रलेख ‘महाड येथील धर्मसंगर व अस्पृश्य वर्गाची जबाबदारी’ हे होत. या प्रदीर्घ अग्रलेखांतून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा दृष्टिकोन, त्यांची भूमिका किती पारदर्शी आणि प्रगल्भ होती, हे लक्षात येते. सदर अग्रलेखांतून त्यांनी रोखठोक भाषेद्वारे तर्कशुद्ध विचारांची मांडणी करतानाच हिंदू धर्माचा नाकर्तेपणा उघड केला आहे. परंतु, तत्कालीन तथाकथित हिंदू वृत्तपत्रके व विचारवंतानी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर टिकास्त्र सोडले. आज विज्ञान-तंत्रज्ञानाने कितीही प्रगती केली असली तरी लोकशाहीप्रणित देशात राजकीय आंबेडकरी चळवळीचे अस्तित्व संपुष्टात आल्याचेच प्रकर्षाने जाणवत आहे. राजकीय दबावगट निर्माण करण्याऐवजी आंबेडकरी चळवळीचे विसर्जन झाले की काय असे वाटते. वास्तविक सध्याच्या राजकारणात स्वार्थीवृत्ती बळकावली असून स्वपदरात काही पाडता येईल का, याचीच त्यांना अधिक चिंता असल्याचे दिसून येत आहे. अशात शासनकर्ती जमात होण्याची स्वप्नेही जणू अस्तंगतच झाली आहेत असे खेदाने म्हणावे लागते. कारण आंबेडकरी राजकारण रिपाइंने आपल्या मूळ उद्दिष्टे आणि ध्येयापासून फारकत घेतली असल्यामुळे हा पक्ष एकाकी पडला आहे. संघर्षाची धार बोथट झाली आहे. आंबेडकरी चळवळ मानणाऱ्या पुढील पिढ्यांचे राजकीय भवितव्य टांगणीवर असल्यामुळे आंबेडकरी चळवळीचे राजकारण सकारात्मकतेने दिशा बदलू शकेल का, ही शंकाच आहे. जागतिकीकरण, खासगीकरणामुळे जुन्या रुढीपरंपरेच्या चक्रव्यूहात ही चळवळ अडकत असल्याचा भास होत आहे. कारण दिवसेंदिवस तरुणाईचे भवितव्य खुजे होत असून तरुण भरकटले जात आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक निकष सिद्धांतावर उभा असलेला रिपाइं पक्ष ग्राह्य ठरविण्यासाठी अनुयायांनी विविध पातळ्यांवर उतरले पाहिजे, पण असे होताना दिसत नाही. कारण निवडणुकीच्या पंचवार्षिक बाजारात ‘एकमत, एक मूल्या’ची किंमत कवडीमोल झाल्याचे खेदाने म्हणावेसे वाटते. त्यामुळे नाममात्र आरक्षणाची स्थितीगती मंदावली आहे. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक दर्जा घसरत चालला आहे. या राजकारणाच्या अधोगतीला दुसऱ्या पिढीचे नेतृत्व जबाबदार आहे. त्यामुळे जेव्हा सर्वसामान्य आंबेडकरी समाजाचा विचार करणारा रिपाइं पक्ष संयुक्तरित्या एकत्र येत नाही तोपर्यंत रिपाइंला चांगले दिवस येणार नाहीत. तेव्हाच खऱ्या अर्थाने महाड मुक्ती संग्रामाची शताब्दी साजरी करता येईल. ज्या समाजनिर्मितीची संकल्पना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राबविली ती अजूनही अस्तित्वात आलेली नाही. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिशानिर्देश केलेल्या मार्ग संक्रमणाची प्रक्रिया नव्या पिढीने केली तरच सामाजिक परिवर्तन अखंड संक्रमण करेल. दलित मुक्ती चळवळीचे आंदोलन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सत्व, स्वाभिमान, आत्मसन्मानार्थ रक्षणासाठी पुढे आणले होते. त्या विचाराच्या वारशाचे आपण सहप्रवासी आहोत. त्यामुळे कोणताही दुराग्रह न बाळगता डॉ. बाबासाहेबांच्या विचारांनी आपल्या उक्ती-कृतीला जोड दिली तर त्यांच्या स्वप्नातील नवसमाज निर्मितीचा उदय होईल यात शंका नाही. महाडच्या मुक्तीसंग्रामाने भारतीय इतिहासालाच नव्हे तर सामाजिक पुर्नरचनेला नवी कलाटणी दिली. म्हणूनच सामाजिक, आर्थिक, राजकीय समानतेचा पल्ला गाठता आला. महाड संगर शताब्दी वर्षारंभाच्या निमित्ताने डॉ. बाबासाहेब आंबेडकराना अभिप्रेत असलेली समताधिष्टीत समाजनिर्मिती झाली पाहिजे. सामाजिक लोकशाही, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय प्रस्थापित झाली तरच भारत देश अधिकाधिक प्रगतीशील राष्ट्र ठरेल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्त्वज्ञानाच्या अंगिकारातूनच अनुयायांच्या सार्वजनिक जीवनाला नवा अन्वयार्थ प्राप्त होईल. एकसंघ - एकात्मतेची मूल्ये जपणाऱ्या भारताला वेगळेच महत्त्व प्राप्त होईल. सलोखा, मैत्रीपूर्ण जीवन जगता येईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांच्या संकल्पनेसाठी कटिबद्ध झालो तरच महाड संगर शताब्दी वर्ष फलदायी ठरेल. महाड चवदार तळ्याच्या मुक्तीसंग्रामाच्या स्मृती चिरंतर स्मरणात राहतील. मानवमुक्तीच्या लढ्याला नवी ऊर्जा देत राहील. ■ ■

महेंद्र गायकवाड
मो. 9850286905

## सुकून — अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

त्याचे वडिल निवृत्त झाले होते. आई कर्करोगाने ग्रस्त होती. ऐकेदिवशी आईने आपल्या लेकाला बोलावले आणि म्हणाली ‘बाळा! आता मी काही दिवसांची सोबती आहे. पण तुला काही मागत आहे. देशील का?’ त्यावर तो म्हणाला ‘आई! तु फक्त सांग तुला काय हवे ?’ ‘मला स्वतःसाठी काहीही नको. पण मी गेल्यावर तु बाबांची काळजी घे. वयोमानाप्रमाणे ते पुढे चालु, फिरू शकणार नाहीत म्हणून तु त्यांचेजवळ बसशील का? तुझ्या प्रगतीची गती वाढावी म्हणून ते आयुष्यभर धावपळ करीत होते पण त्यांच्या मंदावलेल्या चालीची जाणीव ठेव. आता त्यांना कोणत्याही गोष्टीची आसक्ती राहीली नाही. त्यांना हवे फक्त तुझे प्रेमाचे दोन शब्द, तुझ्यासोबतीत काही क्षण. तु केवळ काही क्षण त्यांच्याजवळ बसुन विचारपुस जरी केली तरी तुझा सहवास हा औषधापेक्षाही परिणामकारक असेल. म्हातारपणात कोणतीही व्यक्ती एखाद्या लहान लेकरासारखी होते. ना बुद्धीवर नियंत्रण राहते ना जिभेवर. बालपणी तुझी चिडचिड, तुला आलेला राग त्यांनी हसत हसत स्वीकारला. तु देखील तशीच वागणूक त्यांना दे. तु फक्त काही काळासाठी त्यांना आनंद दे. त्या आनंदाच्या मोबदल्यात तुला ते आभाळभर आशिर्वादाचा खजिना मागे ठेऊन ईहलोकीचा प्रवास संपवतील. हा खजिना तुला जन्मभर पुरणार आहे’ हा संवाद ऐकल्यावर मनातील भाव हेच स्पष्ट करतात की, ‘ बैठो कूछ देर सामने, यकीन के लिए, हर वक्त दवा जरूरी नहीं सुकून के लिए ‘ ■ ■

बहुजन सौरभ

## जनतेच्या विश्वासाचा आधारवड कोसळला
# दत्ता मेघे युगाचा अंत

विदर्भाच्या राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात अढळ ठसा उमटवणारे ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्या निधनाची बातमी ही केवळ एका व्यक्तीच्या जाण्याची घटना नाही; ती एका युगाच्या अस्ताची वेदनादायी जाणीव करून देणारी आहे. सार्वजनिक जीवनात सातत्याने सक्रिय राहून लोकसभा, राज्यसभा आणि विधान परिषद अशा विविध सभागृहांतून जनतेचा आवाज बुलंद करणाऱ्या या दिग्गज व्यक्तिमत्त्वाच्या जाण्याने विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राने एक अनुभवी, दूरदृष्टीचा आणि समाजाशी नाळ जपणारा नेता गमावला आहे. दत्ता मेघे यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. संसदीय व्यासपीठावर त्यांनी केवळ प्रश्न उपस्थित केले नाहीत, तर त्या प्रश्नांच्या मुळाशी जाऊन शासनव्यवस्थेला दिशा देण्याचे काम केले. त्यांच्या राजकीय प्रवासाकडे पाहिले, तर तो सत्तेच्या मोहाचा नव्हे, तर समाजकारणाशी नाळ जोडणाऱ्या आणि विकासाला केंद्रस्थानी ठेवणाऱ्या नेतृत्वाचा प्रवास होता. विकासाच्या असमतोलाने दीर्घकाळ त्रस्त असलेल्या विदर्भासाठी दत्ता मेघे हे केवळ राजकारणी नव्हते, तर ते एक ठाम आवाज होते. शेतीचे प्रश्न, उद्योगधंद्यांची कमतरता, बेरोजगारी आणि पायाभूत सुविधांची उणीव, या सगळ्या समस्यांकडे त्यांनी केवळ आकडेवारी म्हणून पाहिले नाही, तर त्या मागील मानवी वेदना समजून घेतल्या. म्हणूनच त्यांच्या भूमिकेत केवळ राजकीय आक्रमकता नव्हती, तर सामाजिक संवेदनशीलताही होती. राजकारणात त्यांनी सत्तेच्या गणितांपेक्षा विकासाच्या समीकरणांना प्राधान्य दिले. पक्षीय समीकरणांच्या गुंतागुंतीतही त्यांनी आपली स्वतंत्र ओळख जपली. त्यांची शैली आक्रमक असली, तरी ती केवळ विरोधासाठी नव्हती; ती रचनात्मक टीका आणि पर्यायी विचार मांडण्यासाठी होती. शासनाच्या धोरणांवर टीका करताना त्यांनी ठोस उपायही सुचवले, हे त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य ठरते. दत्ता मेघे यांच्या कार्याचा सर्वात भक्कम पाया म्हणजे शिक्षण क्षेत्रातील त्यांचे योगदान. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे, त्यांच्या स्वप्नांना दिशा मिळावी आणि ते आत्मनिर्भर बनावेत, यासाठी त्यांनी उभारलेल्या शैक्षणिक संस्थांनी हजारो कुटुंबांचे आयुष्य बदलले. शिक्षण हे केवळ रोजगाराचे साधन नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे, या विश्वासातून त्यांनी उभे केलेले कार्य आजही प्रेरणादायी आहे. आज शिक्षणाचे वाढते व्यापारीकरण चिंताजनक ठरत असताना, दत्ता मेघे यांनी शिक्षणाला सामाजिक बांधिलकीची जोड दिली. त्यांच्या संस्थांमधून घडणारे विद्यार्थी केवळ पदवीधर नाहीत, तर ते समाजाभिमुख नागरिक असतात, हीच त्यांच्या कार्याची खरी पावती आहे. सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान तितकेच मोलाचे होते. वंचित आणि दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. समाजातील विषमता कमी व्हावी, संधींचे समान वितरण व्हावे, यासाठी त्यांनी कृतीशील भूमिका घेतली. त्यांच्या कार्यात घोषणाबाजीपेक्षा कृतीला अधिक महत्त्व होते आणि हीच बाब त्यांना इतरांपेक्षा वेगळे ठरवते. आजच्या राजकारणात तात्कालिक फायद्यासाठी भूमिका बदलणारे, समाजाशी तुटलेले आणि केवळ सत्तेसाठी धडपडणारे नेतृत्व वाढताना दिसते. अशा काळात दत्ता मेघे यांसारख्या मूल्यनिष्ठ नेत्यांची उणीव अधिक प्रकर्षाने जाणवते. त्यांनी आपल्या राजकीय आयुष्यातील चढ-उतार स्वीकारले, पराभव पचवले; पण जनतेशी असलेली नाळ कधीही तुटू दिली नाही. हेच त्यांच्या नेतृत्वाचे खरे बळ होते. त्यांच्या निधनाने एक मूलभूत प्रश्न समोर येतो की, आजच्या राजकारणात अशा प्रकारचे नेतृत्व घडवले जात आहे का? समाजाशी जोडलेले, विकासाला प्राधान्य देणारे आणि दीर्घकालीन दृष्टी असलेले नेते निर्माण होणे ही काळाची गरज आहे. निवडणुका जिंकणे हेच नेतृत्वाचे अंतिम मापदंड नसून, समाजावर सकारात्मक आणि दीर्घकालीन परिणाम घडवणे हेच खरे नेतृत्व आहे, हे दत्ता मेघे यांच्या कार्यातून अधोरेखित होते. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही. मात्र, त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेणे हीच खरी जबाबदारी आहे. त्यांच्या विचारांना, कार्यपद्धतीला आणि सामाजिक बांधिलकीला अनुसरून काम केले, तरच त्यांच्या स्मृतीला खरी आदरांजली ठरेल. आज अनेकजण त्यांना शब्दांत श्रद्धांजली अर्पण करत आहेत; परंतु खरी श्रद्धांजली ही कृतीतूनच व्यक्त होते. समाजासाठी काम करण्याची जिद्द, शिक्षणाला दिलेले प्राधान्य आणि विकासासाठी घेतलेली ठाम भूमिका, या मूल्यांचा स्वीकार केला, तरच त्यांच्या कार्याला खरी सलामी दिली जाईल. दत्ता मेघे यांचे आयुष्य हे संघर्ष, समर्पण आणि समाजसेवेचा जिवंत आदर्श आहे. त्यांनी ज्या मूल्यांसाठी आयुष्य झोकून दिले, ती मूल्ये आजही तितकीच महत्त्वाची आहेत. व्यक्ती निघून जातात, पण त्यांचे विचार आणि कार्य अमर राहतात, दत्ता मेघे हे त्यापैकीच एक. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना. भावपूर्ण श्रद्धांजली. ■ ■

प्रवीण बागडे
मो. 9923620919




# कचारगडचा प्रचार करणारे पहिले मासिक ‘गोंडवाना दर्शन’!

कचारगड जात्रा सुरु करणारे पाच शिलेदार के. बा. मरस्कोल्हे, मोतीरावण कंगाली, सुन्हेरसिंह ताराम, शितल मरकाम व भरतलाल कोराम या पाच लोकांनी 1984 पासुन जत्रा भरविण्यास सुरवात केली. हे पाच लोक 1980 ला नागपूरला एकत्र आले. त्याचे कारण काय? तर सुन्हेरसिंह ताराम म्हणाले, ‘कलकत्ता लायब्ररीत मी ‘द स्टोरी ऑफ गोंडवाना लॅण्ड, लेखक डि. डी. चॅटरसन वाचले. त्यांत महाराष्ट्रातील भंडारा जिल्ह्यात कचारगड नावाचे अतिप्राचीन गोंड लोकांचे धार्मिक स्थल आहे, जिथे लिंगो नावाच्या महात्म्याने कोयामुरीद्विपातील 750 गोत्रांना कुलचिन्ह वाटप केले, निसर्गपुजा, मातृपुजा, धरतीपुजा, समुहजीवन व अनेक शास्त्रांची माहिती दिली. कचारगड ही आशिया खंडातील सर्वात विशाल व अतिप्राचीन गुफेत 33 बालकांना संबु राजानी बंद करुन शिक्षा दिली. त्यांना महात्मा लिंगो या महा मानवाने गुफेतून सोडविले आणि आदर्श मानव घडविले व संपूर्ण कोयामुरीद्विपात कोया धर्म, संस्कृतीचा प्रचार करण्यास पाठविले. ही माहिती वाचून मनात उत्सुक वाढली होती, कधी कचारगड पाहिल? असे झाले होते आणि योगायोगाने नागपुरवरुन मोतीरावण कंगालीचे पत्र आले, नागपुर आवो, कचारगड जाना है! माझा आनंद गगनात मावेना झाला. नागपूर बैठकीत के. बा. मरस्कोल्हे व कंगालीने पण स्टोरी ऑफ गोंडवाना लॅण्ड वाचून कचारगड जाण्यासाठीच ही बैठक ठेवली होती, शितल मरकाम, भरतलाल कोराम आम्ही पाच लोक कचारगडला आलो, घनदाट जंगल, उंच पहाड, कच्या लोखंडाचे विशाल दगड, रानवेली, महावृक्ष गवत, काटेरी झुडपे. आम्ही तंबु ठोकला. एक चिंचेचे झाडाखाली, तिथे पाण्याची विहीर होती. गावचा पाटील टेंगडी टेकामच्या अंगणात गेलो, तर त्यांनी हाकलून लावले. मात्र के. बा. मरस्कोल्हे याच परिसरातले गोंडी भाषीक होते व सोबत त्यांनी 6/7 माणसे आणली होती. सोबत टार्च, पाणी, काठ्या पावडे, कुराड, रस्ता साफ करण्यासाठी आणले होते. ते घेवुन आम्ही जयबडादेव, जयलिंगो म्हणत चढलो. अतिशय मोठमोठाले खडबडीत दगड आणि पाय ठेवताच खाली घसरणारे दगड. विशाल गुफा पाहुन आनंदाने आम्ही भरुन पावलो. अवाढव्य विशाल भुभाग आजूबाजूला हिरवेगार जंगल, पशुपाखरांची किलबिल, रानटी वाघ, अस्वलिचा, प्राण्यांचा हा रहिवास होता. गुफेचे दर्शन घेऊन महात्मा लिंगो, जंगोबाई व कलिकंकाली आईचे नावानी आम्ही धुप जाळला, वर मोठमोठाले आगे मोहाळ होते. आम्ही गुफेला डोळ्यात, मनात साठवून जणु काही प्राचीन काळातील पुर्वजांची दौलत घेऊन आम्ही जयजयकार करीत उतरलो. दुसरे दिवसी आजुबाजुचे गावात जावुन लिंगो, जंगो, कचारगडची माहीती घेऊन परतलो. पुन्हा 1984 ला आलो. 85ला आम्ही छोटी बाजारासारखी जत्रा भरवली. मोठी जत्रा भरवायचे ठरविले. क्लास वन अधिकारी पदाचा राजीनामा देऊन दिल्ली येथे पीएचडी व पत्रकारीता करुन 1983 ला ‘गोंडवाना सगा’ हे हिन्दी साहित्यिक मासिक तारामजी काढत होते. त्या मासिकात कचारगडची सर्व प्रथम माहिती व लेख लिहिल्या गेले होते. मोतीरावण कंगाली, शितल मरकाम, के. बा. मरस्कोल्हे व इतरांचे पहिले लेख छापणारे मासिक गोंडवाना सगा 1983 होते, नंतर 1985 ला गोंडवाना दर्शन नावानी रजिस्ट्रेशन नंबर मिळाला. तोपर्यंत गोंडवाना दर्शननी कचारगडचा खुप प्रचार, प्रसार केला. संस्थापक, संपादक सुन्हेरसिंह तारामनी भारतातील अनेक राज्यांत महाराष्ट्र, म. प्रदेश, छ. गड, आंध्र, कर्नाटक, झारखंड, ओरिसा, उ. प्रदेश, बंगाल इ. राज्यांत जावुन गोंडवाना दर्शनचे माध्यमातून लोकांना जोडले, नविन लेखक, शोधकर्ते, कवी साहित्यकार तयार केले’ गोंडवानाचा इतिहास, कचारगड, लिंगो, जंगोबाई, भाषा, संस्कृती इतिहास ही प्रकाशित झालेली माहिती समाजातील लोकांनी पहिल्यांदाच पाहिली होती. असे भरतलाल कोराम सांगतात, तो पर्यंत आमचे लिखीत साहित्य लोकांना माहीत नव्हते व इतर कोणतेही पेपर आदिवासींचे साहित्य प्रकाशित करीत नव्हते. 70चे दशकात गोंडी साहित्यांची ओळख करुन देणारे व 32 वर्ष साहित्य, इतिहास लोकसाहित्य बोली, लिपी व कचारगड सोबतच गोंडराजवटीचा इतिहास लिहुन साहित्य क्षेत्रात आपला अमिट ठसा उमटविणारे गोंडवाना दर्शन व संपादक गोंडवाना दर्शनला जाते. 1986 ला कचारगडला मोठी जत्रा भरविली, अनेक कार्यकर्ते, समाज सेवक एकत्र आले. शिवाजीराव मोघे आदिवासी मंत्री नवी दिल्ली, यांचे हस्ते सप्तरंगी ध्वज फडकविण्यात आला. शितल मरकाम, मोतीरावण कंगाली, सुन्हेरसिंह ताराम, कोमलसिंह मरई, उज्जनसिंह वटी, रामनाथ ओइमा, पुरुषोत्तम, शेडमाके सारख्या लोकांनी कचारगड व लिंगोचे तत्वज्ञान, जंगोरायताडचे शैक्षणिक कार्य व समाज सेवा, कलीकंकालीचे कार्य, संगीत सम्राट हिरासुका पाटालिरची गाथा, मंचावरून लोकांना ऐकविली. गोंडी नृत्य वाद्य, संगीताने लोकामध्ये उत्साह व जनजागृती झाली आणि गोंडवाना दर्शनने भारतभर कचारगडचा खुप प्रचार केला. लोकांची मागणी वाढली आणि जिथे पाच लोक आले त्या ठिकाणी पाच लाख लोक येतात. सुन्हेरसिंह तारामजींनी गोंडवाना दर्शन 1983 ते 2018 पर्यत गोंडवाना दर्शन 32 वर्ष लगातार काढले, यात 18 गोंडी साहित्य संमेलन व 25 वर्षात सिल्वर जुबली धुमधडाक्यात मनविली. आज भारतातील अनेक राज्यांत गोंडवाना संघटना, भाषा, लिपी, संस्कृती, इतिहास लोकसाहित्य, जल-जंगल, अस्मिता, अस्तित्व, स्वाभिमान व जनजागृती झाली. त्यांत सिंहाचा वाटा गोंडवाना दर्शन संपादक सुन्हेरसिंह तारामजींचा आहे. ■ ■






ऊषाकिरण आत्राम ताराम
मो. 9923078552

# मुळनिवासींचा संक्षिप्त इतिहास

भारतामध्ये हिंदूचे जे बारा ज्योतीर्लिंग दाखविण्यात येते, ते वास्तविकरित्या, गोंडांचे दैवत सुकमावेल्लारचे मुले आहेत कोया धर्म आचारसंहिताचे जनक, गोंडी आचार नियमावलीचे निर्माते पारी कुमार लिंगोचा जेव्हा अवतार झाला (महान मानवांच्या जन्माला अवतार मानल्या जातों) तेव्हा गुफेमध्ये (आजचा कचारगड तिर्थक्षेत्र) बंद त्या बारा संतानांची मुक्तता करवून, त्यातील प्रत्येकाला, जनतेची सेवा करण्याचे कार्य सोपवून, राज्य संचालनाची जवाबदारी देवून, वेगवेगळ्या प्रांतात पाठविण्यात आले. भारतामध्ये अनादिकाळापासून कुयवाराष्ट्र म्हणजेच गोंडीयन शासन व्यवस्था होती. या इतिहासाचे प्रमाण (साक्ष) ऋग्वेदात मिळतात. भारतात जे काही पुरातन राजमहल व किल्ले आहेत त्यांचे निर्माते गोंड तथा द्रविडयन वंशाचे राजे होते, असे वर्णन मैथिली रूपनाथ ओझा यांच्या ‘गढेश’ रूप वर्णन या काव्य संग्रहात पहायला मिळतो. गोंडांचे वंशदेवता 24 (7+6+1+4+2) (जंगो+लिंगो) या कोयावंशीय देवतांना सम्राट अशोकने अंगिकृत केलेले आहे. नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी याच 24 या देवतांना भारतीय राष्ट्रीय ध्वजामध्ये, 24आरेंच्या (तिलिया) रूपाने स्थान दिलेले आहे. आज भारतामध्ये जे राज्य वेगवेगळ्या नावाने प्रचलित आहेत, ते एकेकाळी गोंड आणि द्रविडियन राजांच्या अधिनस्त असतांनी, बंगाल-बंगासूर, ओरिसा-ओरियासूर, मद्रास-मद्रासूर, आंध प्रदेश-आंध्रासूर, केरला-केरलारसूर, कर्नाटका-महिसासूर या राजांच्या नावाने, असे 14 राज्य ओळखल्या जात होते. सूरचा (असूर नाही) अर्थ इथे मदिरा सेवन न करणारा, नशा न करणारा असा होतो. आर्य निर्मित ऋग्वेदामध्ये ज्या ‘दस्यु सेनापति शंभूर’ (पुत्र कुलीतर) चा नाव आलेला आहे तो शंभूर गोंडाचा कैलासपती (कैलास पर्वतावर राहणारा) आध्य अधिपती महासूरच (महादेव) होय. रामायणकाळ तथा या पूर्वीच्या ऋग्वेदकाळाच्या पूर्वीच्या युगांत नागरी जीवन जगणारे ‘दस्यू-पणी- कुयवा’ जमात, हिच गोंड जमात होय. या बाबत प्रसिद्ध लेखक ना. तु. बांबोले साक्ष देतात. ज्याला आज भारतभूमीत महादेव या नावाने प्रचलित करण्यांत आलेले आहे, ते मुळतः महासूर म्हणजेच शंभूशेख (88 शंभूशेख पैकी एक) कोयाभुखंडातील (गोंडवाना लॅन्ड) महान शक्तिशाली (सम्राट अशोक मौर्य सारखे) गोंड महाराजे होवून गेलेले आहेत. येथील मुळनिवासींवर, बाहेरून आलेल्या ब्राह्मणांनी आक्रमण केलेत, तेव्हा त्यांचा सामना आदिवासी लोक करू शकले नाहीत, म्हणून पराजीत झालेत, पराजीत लोकांना आर्यानी गुलाम बनविलेत. त्यांची संस्कृती, सभ्यता, नष्ट करणे सुरू केलेत, आपली काल्पनीक आर्य संस्कृती, देवी देवतांची मुर्तीपुजा, त्यांच्यावर थोपून दिली. गोंड समुदायाला ही संस्कृती, ही पुजा अवघड वाटली, स्विकृत केले नाही आणि जंगलाच्या दिशेने पळून गेलेत. तिरे वास्तव्य करून आपली मुळ बोलीभाषाचा, सभ्यतेचा संस्कृतीचे जतन करीत टिकवून ठेवलेत. आपल्यामुळे वंशवेलीमध्ये रक्तमिश्रिण होवू दिले नाही. असे गोंड आदिवासी चेहऱ्याने आजही ईतरांच्या तुलनेत वेगळे, चपटे नाक, जाड ओठ असणारे दिसून येतात. त्यांचा dna आजही, परदेशी आर्यांच्या आणि भारतातील रक्त मिश्रण (आर्यांशी) झालेल्या भारतीयांशी (dna) मेल न खाण्याचे, एक मोठे कारण हे राहीले आहे. कालांतराने भारतात नगरांचा, महानगरांचा विस्तार व निर्माण झाला, तेव्हा त्या ठिकाणी आर्यांचे वास्तव्य राहीले, पण आपल्या लाजाळू स्वभावामुळे भित्रेपणामुळे, गोंडाचे वास्तव्य त्यांचेसोबत राहीले नाही. ग्रामीण भागात उपजिवीकेचे जे साधन मिळाले, त्यातच ते संतुष्ट होते. हमलावर कब्जाधारी आर्यांना माहीत होते, आम्ही संख्येने कमी आहोत, येथील मुळनिवासी संख्येने जास्त आहेत, यामुळे जास्तवेळ राज्य करणे, गुलाम बनवून ठेवणे, सोपे होणार नाही, म्हणून आपल्या येणाऱ्या पिढीचे भविष्य सुरक्षित राखून ठेवण्यासाठी, त्यांनी अशा व्यवस्थेचे निर्माण केले की, ज्यामुळे आर्यांचा कमजोर आणि अल्पसंख्यक वर्ग देखील सत्तासीन राहू शकेल, शिवाय येथील मुळनिविसींना गुलाम बनवून, सेवकाच्या रूपाने उपयोग करता येईल. ही व्यवस्था होती आणि आतापण आहे, ज्याला वर्ण-व्यवस्थाच्या नावाने ओळखल्या जातो. या देशात आर्य येण्याआधी म्हणजे चार हजार वर्षाआधी भारतात मुळनिवासी गोंडांची सार्वभौम सत्ता होती, अर्थात आज जिर्ण अवस्थेमध्ये दिसणारी गोंडी सभ्यता एकेकाळची भारतातील मातीतल्या कणाकणामध्ये एकरूप झालेली मोतीच्या मोलाची सभ्यता होती. ऋग्वेदात कुयवा राष्ट्र म्हणजे गोंडीयण सभ्यतेचे राष्ट्र असा उल्लेख आलेला आहे. यामुळे निर्विवाद जाहीर होतो की, भारतात आदिवासी गोंडीयण सामाज्याचा शक्तिशाली राष्ट्र होता. सालवृक्ष व गोंड समाज सालवृक्ष ज्याला सालयी वृक्ष देखील म्हणतात. सालवृक्षाला गोंड जमातीचे कुलदैवतच्या रुपाने मान्यता मिळालेली आहे, त्याप्रमाणे सांस्कृतिक व धार्मिक दृष्टिने देखील या वृक्षाला मान्यता प्राप्त झालेली आहे. ज्याप्रमाणे पिंपळाच्या वृक्षाला, प्राणवायु देणारा, पवित्र वृक्ष मानला जातो, त्याचप्रमाणे गोंड जमातीमध्ये सालवृक्षाला, धार्मिक विधि संपन्न करण्यासाठी अतिशुभ, अति मंगलमय, आणि विशेषतः वैज्ञानिक दृष्टिने, जीवन रक्षक (हृदय विकार नष्ट करणारी शक्ती) बहुपयोगी औषधीवृक्ष मानला गेलेला आहे. वृक्षाचे संवर्धन करणारा, जंगलांचे रक्षण करणारा, पर्यावरणाचा परममित्र, या जगात कुणी असेल तर तो गोंड आदिवासी आहे. याला कारण म्हणजे सृष्टिचे (प्रकृतिचे) रक्षण, निसर्गाची जोपासना, गोंडीयण समुदायाचा संस्कृतिचा भाग आहे. गोंड आदिवासींनी आपले आडनावांचे नाव वृक्ष, पशु, पक्षी व फळांच्या नावावर ठेवून, नैसर्गिक उत्पादनाला मोठा मान दिलेला आहे. इतकेच नव्हे तर आपल्या गाव-बोळ्यांचे नाव पण (तुमडीटोला, घोटी, बोदालझिरी, कमकासूर, बेलदा, मरकासूर, मरकाटोली, लैंडेझरी, जामखेडा) याच पशू पक्षी वृक्ष आणि फळांच्या नावाने ठेवलेले आहे. याचे कारण आहे की, गोंड आदिवासींच्या संस्कृतीला, जगातील महान संस्कृती आणि सर्व संस्कृतींचा जन्मात्रीचा सन्मान मिळालेला आहे.




जेव्हा राम-रावणाचे (महाप्रतापी गोंड राजा) युद्ध झाले ते व्हा, युद्ध ठिकाणातील आणि आजूबाजूला असलेल्या सालवृक्षांचे मोठ्या प्रमाणात कत्तल व नष्ट, रामाच्या सैन्याने केले. नष्ट करण्यामागील रामाच्या सेनेचे उद्देश, रावण आणि त्याच्या सेनेला ठेस पहुंचिये होते. या निंदनीय घटनेचा उल्लेख, रामायणात देखील आलेला आहे. प्रसिद्ध साहित्यकार, इतिहासकार हिरालाल शुक्लने आपल्या साहित्यात देखील या घटनेचा उल्लेख केलेला आहे. या ठिकाणाला सालान प्रदेश म्हटले जाते. यालाच दंडकारण्य (विंद्याचल प्रदेश) नावाने ओळखल्या जाते. गोंडांचे आराध्य दैवत कुवारा भिमालपेनचे वास्तव्य देखील याच भागात होते. भारतात काही जाती धर्माचे लोक दशहऱ्याच्या दिवसाला रावणाच्या लंकेवर, रामद्वारा विजय प्राप्त झाल्याचे आणि रावणाचे रामद्वारा वध केल्याचे आनंद मोठ्या उत्साहाने साजरा करतात. अशा प्रकारच्या वेगवेगळ्या घटनांना वेगवेगळ्या नावाने, सनाच्या रुपाने लोक साजरा करतात. या घटनांमागील वास्तविकता हे आहे की, भारताचे मुळनिवासी गोंड राजांचे महाल, राजमहल, प्रजेचे गाव आर्य ब्राह्मणांनद्वारे जाळून, आदिवासींची धन-संपत्ती लुटपाट करून, छलकपटाने त्यांची हत्या करून, त्यांच्या महिलांचे अपहरण करून, त्यांना गुलाम बनवून, कैद करून, आर्य लोक या षडयंत्रांना, पाखंडांना, सणांचे नाव देत आलेले आहेत. जसे दिपोत्सव दिवाळी, विजयदशमी दशहरा, होलीकाची हत्या होळी, महिषासुर हत्या दुर्गापूजा, नवरात्री, महाराजा संभाजींची हत्या गुढीपाडवा इत्यादि सण वास्तविकतेपासून दूर आहेत. पाखंडाचा बाजारभर आहे. फक्त आर्यांचे षड्यंत्र सफल झाल्याचे दिवस मात्र आहेत. हडप्पा आणि मोहनजोदडो याठिकाणी पुरातत्व विभागातील सर जान या मोठ्या ब्रिटिश अधिकारीने सन 1922ला खोदकाम करवून घेत असतांना मोठ्या प्रमाणात चित्रलिपीच्या रूपाने वस्तू सापडल्यात. त्या 196 चित्रलिपींचे उद्बोधन (वाचन) गोंडीभाषेचे व गोंडी संस्कृतिचे तज्ञ आचार्य मोतीरावन कंगाले साहेबांनी केलेले आहे, या वाचनाला आणि त्या चित्रलिपीतून तंतोतंत अर्थाला जगातील सर्वच भाषा व लिपी विद्वानांनी मान्यता दिलेली आहे. हरियाणा राज्यात असलेल्या राखीगडी येथील उत्खननात सापडलेल्या वस्तूंचे व वसाहतींची रचना याचे संबंध गोंडवाना कालखंडातील (कुयवा राष्ट्रातील) गोंड मुळनिवासींचे असल्याचे प्रमाणित झालेले आहे. जवळजवळ 1750 वर्षे या भारत भुमीत मुळनिवासिनी शासन केलेले आहे. त्यात सर्वात मोठी अवधी 24 परगणे, 52 गडचे पराक्रमी महाराजे संग्राम शहा मडावी (संग्राम सिंह) ई. स.1400 ते 1500 च्या काळात मंडला या शहरात, राजधानी असलेल्या गोंड मुळनिवासींने राज्य केलेले आहे. ज्यांच्या शासन व्यवस्थेत स्वताचे राजचिन्ह (हत्तींवर सिंहाची सवारी) व 10 ग्राम सोन्याची नाणी, स्वतःची सेना, स्वतःची शासन व्यवस्था होती. स्वातंत्र्याच्या लढ्यात पूर्ण भारतात एकमेव उदाहरण, महाराजा शंकरशहा व रघुनाथ शाह, ज्यांना 1857 ला इंग्रज शासकांकडून फाशी देण्यात आली. ते गढ़ा (जबलपूरचे) चे गोंड शासक होते, इतरांनी इंग्रज शासकाशी समझौता करून आपली राजशाही आबाधीत ठेवली, पण या स्वाभिमानी मुळनिवासी शासकाला ते करता आले नाही. याठिकाणी हेही सांगायला हरकत नाही की, स्वातंत्र्याच्या लढ्यात सर्वात जास्त 70 प्रतिशत आदिवासी लोकांचा सहभाग होता. गोंडी भाषा, गोंडी धर्म, गोंडीयन समाजरचना (सगा पद्धती) गोंडीयण विचारधारा आणि गोंडीयण शासन व्यवस्था या सर्वांशी तथागत बुद्धांची, बुद्ध दर्शनवर आणि बुद्ध ग्रंथात दिलेले बुद्धांचे संदेश व त्यांच्या वचनांवर (प्रबोधनांवर) तुलनात्मक दृष्टिने समिक्षात्मक अभ्यास केल्यावर, मुळात गोंडीयण सभ्यता व गोंडीयण (समाजवादी) विचारधारेची पृष्ठभूमी पाहायला मिळते. शिवाय समजण्यासाठी दुसरे उदाहरण देता येईल की, संस्कृत भाषेमध्ये गोंडी भाषेमधील शब्दांचा भरमार पाहायला मिळतो. त्यामागील कारण आहे, आर्यांनी गोंड आदिवासी महिलांचे अपहरण करून सोबत ठेवले. तिथे महिला गोंडी भाषा बोलत होत्या. म्हणून संस्कृत भाषेत गोंडीचा प्रभाव पाहायला मिळतो. अर्थात बुद्धांचे तत्वज्ञान आणि पारीकुपार लिंगांची (गोंडीयण धर्मगुरु) विचारधारा यांचे नाते खुप जवळचे होते, आहे हे नाकारता येत नाही. लिंगोवाद कोया (गोंडी) पुनेम दर्शनचे 12 वे गुरु आणि महान योगी अलर कलाम लिंगो यांनी साख्य दर्शनला प्रस्तुत केले. यातुनच तथागत बुद्धांना ध्यान आणि समाधी मार्गाची दिशा मिळाली. पाली धर्म ग्रंथांनुसार अलर कलाम गौतम बुद्धांचे गुरु मानल्या जातात. तथागत बुद्धांच्या आधी, गोंड वंशाचे राजे वरचाका (वरशिखा) पणी, कुयव, शंभर, शंभू, भिमाल, भिम, दंडक, रावेन, या महायोद्धांनी हिंदू आर्य, वेद तथा यज्ञ कर्मकांडांविरुद्ध सतत लढत राहून, आपली मुळनिवासी गोंडीयन सभ्यता टिकवून ठेवली. तीच विचारधारा तथागत बुद्धांनी आत्मसात करून, आपल्या अद्भूत प्रतिभा आणि सखोल अध्यानाच्या बळावर, विचारांना गणितासारखे शुद्ध रूपाने मांडणी करून, जगाला तत्वज्ञान दिले. तथागत बुद्धांच्या नंतरही, येथील गोंड राजांनी, तथागत बुद्धांच्या विचारधारेचा, तत्कालीन व उत्तरकालीन प्रख्यात गोंड राजांनी (प्रभावित होवून) अनुसरण केल्याचे साक्ष मिळतात. कलिंगची गोंड राणी घुसिता, वैरागडचे राजे वजीरधर नामक गोंड राजाची पुत्री होती, ती राणी आणि भांदक तथा शिरपूरचे गोंड राजे देखील बौद्ध धर्माच्या प्रभावात होते, ज्याच्या शासन काळात, जगतप्रसिद्ध अजिंठ्याची बौद्ध लेण्या (स्तुप) निर्माण करण्यांत आलेत. या मूर्छित इतिहासाला, जगासमोर आणण्याचे धाडसी कार्य, इतिहासकार जे. एन. सिलने केलेले आहे. भारतीय गणतांत्रिक व्यवस्थेचे मुळ खुप सखोल आहे. सम्राट अशोक आणि त्यांचा मौर्य वंश अर्थात मौर्य म्हणजे मारा गणामधून मारा गोंडवंशामधून आलेला आहे. सम्राट अशोकद्वारा निर्मित सर्व शिल्प गोंडी संस्कृतिशी संलग्न असल्याचे अर्थ निघतात. यामुळे सारनाथ येथील स्तंभाच्या वर दिसणारे चतुर्मुद्रांकित सिंह आणि त्यांचे खाली दर्शविलेले चक्र, हे गोंडीयन वंश निर्माण चक्र व गोंडांचे चार सगा शाखा (चार देव पाच देव सहा देव सात देव) प्रतिक आहेत. आजचा गणतांत्रिक भारत हे प्राचीन गणतांत्रिक अर्थात गोंडीयन तंत्र शासन पद्धतीचा खरा वारिस आहे. भारत सरकारचा मानचिन्ह आणि मानमुद्रा हे गोंडीयन सभ्यतेने भारताला बहाल केलेले अनमोल देन आहे. (गोंडी संस्कृतिचे संदर्भ व्यंकटेश आतराम) छंद हे बुद्धांच्या राजदरबारामध्ये प्रधानमंत्रीची जवाबदारी सांभाळत होते. छंद बुद्धांचे मित्र होते, बुद्ध जेव्हा कौटुंबिक जीवन त्यागून, तपश्चर्येला बाहेर निघाले, तेव्हा त्यामागील गुपीत फक्त छंदालाच सांगून निघाले होते. बुद्धांचे प्रथम आणि विश्वासपात्र पट्टशिष्य म्हणून छंदालाच मानल्या जाते. छंद गोंड जातीचा होता. एवढा सगापण (आप्तभाव) छंद बरोबर असल्याचे कारण आणि मागे दर्शविल्याप्रमाणे गोंड महाराणीचा (चुहिया) बुद्ध धर्माबद्दल आपुलकी (जवळीक) हे दर्शविते की, या मागे घनिष्ठ नाते होते आणि ते नाते आहे, गोंडीयण आणि बौद्ध धर्मियांमध्ये वंशीक एकता असल्याचे. बुद्धांच्या वडिलांची नगरी अपील वस्तू मानली जाते. माता माया (महामाया), कोईया (कोलारिया) गावातली, गोंड जमातीची. कपीलवस्तू नगरी अर्थात कोपालवंशीय लोकांची वस्ती होती. कपील म्हणजे कोपाल, वस्तू म्हणजे, वसाहत, अर्थात कोपाल लोकांची वसाहत होती. कपील म्हणजे कोपाल (गोंडामधील एक उपजात) सम्राट अशोक मौर्या देखील मारीया गोंड जमातीचे होते. चंद्रगुप्त मौर्य, बिंदूसार मौर्य राजघराने गोंड जमातीचे होते. (गोंडी संस्कृतिचे संदर्भ-व्यंकटेश आतराम) भारतीय संविधानात डॉ. आंबेडकरांनी तथा आदिवासींचे झुजारू नेते, स्व. जयपालसिंहजी मुंडा (भारताचे पहिले (CS) यांनी आदिवासींकरिता अजून एक विशेष संविधान बनविलेत (5 वी तथा 6 वी अनुसूचि) ज्यामुळे आदिवासी जनता आपल्या हाताने आपला चौतरफा विकास स्वतः करू शकत होता. ही व्यवस्था त्या अनुसूचीमध्ये समाविष्ट होती, परंतू राज्यांद्वारे अंमलबजावणी करण्यासाठी जो आवश्यक कायदा तथा नियमावली भारत सरकारने बनवायला पाहिजे होते, ते नियमावली सरकारने आजपर्यंत बनविलेले नाही. या अनुसूचि अंतरगत article 244 नुसार प्रावधान केलेले आहे. 5 वी अनूसूचीला देशाच्या 10 राज्यात मान्यता दिलेली आहे, पण लागू केलेली नाही, या अनुसूचीच्या अंतरंगात प्रत्येक जिल्ह्यात एक जिल्हाधिकारी, व दोन C.O., नियुक्त असतात. पैकी एक 8.0. फक्त आदिवासींच्या बाबत कामकाजावर देखरेख करण्यासाठी नियुक्त केलेला असतो, प्रत्येक अनुसूचीत जनजाति सलाहकार परिषदेची स्थापना करावयाचे असते. ज्यांची जवाबदारी सरकार आणि राज्यपालाशी आदिवासी बाबत आवश्यक चर्चा करणे सल्ला देणे असते. समाजात जे जातीय दंगे, धार्मिक दंगे होत असतात, त्यामागे राजकारणी नेत्यांचा हाथ अवश्य असतो. या दंग्यामधूनच नेते मंडळी वोटबँक बनवून घेत असते. आदिवासी असल्या दंग्यापासून नेहमी दूर राहितो, परंतू सध्या ब्राह्मणांच्या माकडी जाळ्यात घूसून, हिंदू आस्थेच्या आहारी जावून, अलिकडे शहीद झाल्याचे दिसून येतो. या प्रकारच्या क्षम्य चुका आदिवासींकडून यामुळे होत आहे की, ईतरांच्या षडयंत्राची समज त्याच्यात आलेली नाही. ■ ■



प्रभुलाल परतेती
मो. 9422818921

स्वाभिमानाचे स्मरणशिल्प १०८

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा सातारा, ता. कुही, जिल्हा नागपूर.



सातारा येथील गावात डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक चळवळीचे केंद्र आहे कुही, मांडळ, वेलतूर ही बाजारपेठ आलेली असलेली गावे आहेत. डॉ. बाबासाहेबांच्या पुतळा येथे दिनविशेषला विशेष कार्यक्रम होतात.

संवाद मित्र, कपिल नारनवरे
मो. 9370773608

## महत्वाचे

### योगीता दयाराम बरडे यांना 'राजमाता जिजाऊ पुरस्कार



**नागपूर :** रामटेक तालुक्यातील एका छोट्याशा गावातील शेतकऱ्याची लेक योगीता दयाराम बरडे यांना सामाजिक, शैक्षणिक व महिला सशक्तीकरणाच्या क्षेत्रातील उत्कृष्ट कार्याबद्दल तसेच नव्या पिढीतील मुलींसाठी प्रेरणास्थान ठरल्याबद्दल प्रतिष्ठित 'राजमाता जिजाऊ पुरस्कार 2026' ने सन्मानित केले. हा पुरस्कार आविष्कार सोशल अँड एज्युकेशनल फाउंडेशन, कोल्हापूर यांच्या वतीने आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त आयोजित राज्यस्तरीय सोहळ्यात प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला आमदार सुधाकर कोहळे प्रमुख पाहुणे होते. तसेच डॉ. कापटा, पूर्णिमा कापटा, रेनू सिधू कौर व माया गायकवाड यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. योगिता बरडे यांनी आपल्या कार्यातून समाजात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले असून, त्यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांना हा सन्मान दिला.

### बहुजन हिताय संघाची साप्ताहिक सभा



**नागपूर :** बहुजन हिताय संघाच्या साप्ताहिक सभा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन, नागपूर येथे पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी प्रा. विनोद गजघाटे तर प्रमुख अतिथी चंद्रप्रभा मून यांची उपस्थिती लाभली. प्रमुख अतिथी चंद्रप्रभा मून यांनी बावीस प्रतिज्ञा वदवून घेतल्या. बौद्धाचार्य प्रकाश सोनटक्के यांनी 8 ते 14 मार्च या कालावधीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या महत्त्वपूर्ण कार्यांची माहिती दिली. सुत्तपाठनात बौद्धाचार्य देविदास राऊत यांनी आर्य अष्टांगिक मार्ग, आर्य सत्य आणि धम्मचक्र प्रवर्तन सुत्त याविषयी मार्गदर्शन केले. प्रथमच आलेल्या नवीन सदस्यांनी मनोगत व्यक्त केले. यात प्रा. आनंद भालेराव यांनी मनोगत व्यक्त केले. प्रमुख अतिथी चंद्रप्रभा मून यांनी सांगितले की, स्त्रिया कोणत्याही क्षेत्रात कमी नाहीत. अध्यक्ष प्रा. विनोद गजघाटे यांनी सामाजिक-धार्मिक कार्यात तत्पर राहण्याचे आवाहन करून, वृद्धाश्रमाबाबत माहिती दिली. संचालन मंगला जांभूळकर, प्रास्ताविक प्रा. नंदा भगत तर आभार चुन्नीलाल जांभूळकर यांनी मानले. धम्मपालन गाथा प्रा. नंदा भगत, राष्ट्रगीत अरुणा पाटील आणि नीता रामटेके यांनी सादर केले.

### शेगाव येथे बौद्धाचार्य परीक्षा शांततेत



**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभेतर्फे बौद्धाचार्य-बौद्धाचार्या परीक्षा तसेच केंद्रीय शिक्षक/शिक्षिका प्रवेश परीक्षा (सी.टी.ई.टी.) शेगाव येथील लुंबिनी बुद्ध विहार येथे आयोजित करण्यात आली. ही परीक्षा बुलढाणा उत्तर जिल्हा शाखेच्या मान्यता प्राप्त केंद्रावर पार पडली. परीक्षेचे नियोजन व व्यवस्थापन उत्तम पद्धतीने करण्यात आले. या परीक्षेत एकूण 17 श्रामणेर सहभागी झाले होते. परीक्षेमध्ये 50 गुणांचा लेखी पेपर, ऑब्जेक्टिव्ह प्रश्नपत्रिका, विधी प्रात्यक्षिक तसेच सामान्यज्ञानाच्या चाचण्या घेण्यात आल्या. शेवटी परीक्षार्थी व परीक्षकांचे मनोगत ऐकून कार्यक्रमाचा समारोप करण्यात आला. मुख्य व्यवस्थापक एस.एस.वले, जिल्हाध्यक्ष यांनी उत्तम रीतीने केले, परीक्षा केंद्रावर मुख्य परीक्षक म्हणून, अशोक केदारे महाराष्ट्र राज्य सरचिटनीस यांनी काम पाहिले व सहाय्यक परीक्षक म्हणून देवानंद वानखेडे, वरीष्ठ केंद्रीय शिक्षक यांनी काम सांभाळ, त्यापरीक्षेत एकूण 17 श्रामणेर परीक्षेला बसलेत, त्यामध्ये 50 गुणाचा लिखित पेपर देण्यात आला, एक ऑब्जेक्टीव्ह पेपर देण्यात आला, त्यानंतर विधीप्रात्यक्षिक आणि सामान्यज्ञान अश्या चाचण्या घेण्यात आल्या, परीक्षा केंद्र अतंत्य शांततेच्या वातावरणात पार पाडण्यात आले. परीक्षार्थीचे व परीक्षकाचे मनोगत घेण्यात आले.

## निधन वार्ता

### शोभा बोरकर



**नागपूर :** पावन भूमी, 161 मेहेर कॉलोनी वर्धा रोड, नागपूर शोभा बोरकर यांचे 23 मार्च 2026 रोजी सकाळी दीर्घ आजाराने वयाच्या 75 व्या वर्षी निधन झाले. त्यांचा अंत्य संस्कार सहकार नगर स्मशानभूमी येथे पार पडला. हर्षा कापसे यांच्या आई व डॉ. चंदूराज कापसे यांच्या सासू होत्या. सना कापसे, देवयानी भगत, डॉ. सुनिल भगत, सुषमा शेवडे, सुमेर शेवडे आणि इतर बोरकर, कापसे परिवार आणि मान्यवर मंडळी दुःखात सहभागी आहेत.

# खाजगी शाळा शिक्षक संघाच्या विभागीय अधिवेशनाची सांगता



**नागपूर :** खाजगी शाळा शिक्षक संघाचे विभागीय अधिवेशन अध्यापक भवन, गणेशपेठ नागपूर येथे संपन्न झाले. अध्यक्षस्थानी खाजगी शाळा शिक्षक संघांचे अध्यक्ष प्रमोद रेवतकर होते. संपादक प्रमोद काळबांडे हे उद्घाटक होते. तर आ. विकास ठाकरे, नगरसेविका स्नेहल ठाकरे, मध्यवर्ती कर्मचारी महासंघाचे महाराष्ट्र अध्यक्ष अशोक दगडे, माध्यमिक उपशिक्षणाधिकारी किरण चिनकुरे, आश्रम शाळा कर्म. संघटनेचे अध्यक्ष तेजराज राजूरकर, राजेश हाडके, सिबियस्सी अध्यक्षा दीपाली डबली, खाजगी शाळा शिक्षक संघांचे सचिव विजय नंदनवार, केंद्रीय कार्याध्यक्ष राहमातूला खान व विभागीय कार्याध्यक्ष संजय बोरगावकर उपस्थित होते. पेंशन हा कर्मचाऱ्यांचा महत्त्वाचा प्रश्न आहे. कर्मचाऱ्यांनी एकजुटीने लढा दिल्यास यावर तोडगा निघू शकतो, शिक्षकांचे प्रश्नांना विधानसभेत मांडण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन आ. विकास ठाकरे यांनी दिले.

अशोक दगडे यांनी सांगितले की, पेन्शन स्कीम पर्याय निवडीबाबत 31 मार्च 2026 पर्यंत मुदत आहे. तेव्हा कोणती योजना स्वीकारावी यावर मार्गदर्शन केले. तेजराम बांगडकर यांनी टी.ई.टी. संदर्भातील सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय, आरटीई ॲक्ट, एनसीटीई यांनी शिक्षकांच्या पात्रते संदर्भात ठरविलेले निकष, केंद्र सरकार व राज्य सरकार यांनी काढलेल्या अधिसूचना व शासन निर्णय याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले. लोकपाल चापले यांनी अनुकंपा नियुक्ती संदर्भात खाजगी शाळा संघाने अनुकंपाधारक कुटुंबातील शिक्षक, विधवा यांचेसोबत दिलेल्या लढ्याची माहिती दिली. कोरोना काळात देखील संघटनेने अनुकंपा नियुक्तीसाठी खूप काम केलेले आहे. शिक्षकांच्या योग्य समस्यांना मी प्राधान्य देणार व चांगल्या कामासाठी शिक्षकांना त्रास होणार नाही. असे मनोगत उपशिक्षणाधिकारी किरण चिनकुरे यांनी व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानेश्वर वाघ यांनी तर विजय नंदनवार यांनी अहवाल वाचन केले. दिपिका हेडाऊ व ललिता तिडके यांनी संचालन केले. तसेच अधिवेशन संयोजन समितीच्या पदाधिकारी व सेवानिवृत्त महिला, पुरुष शिक्षकांचा सत्कार करण्यात आला. यशस्वीतेसाठी प्रमोद कुंभारे, विजय आगरकर, मोरेश्वर मौदेकर, पवन नेटे, लतेश कोरडे, अतुल भुरे, पुरूषोत्तम टोंगे, रवींद्र जेनेकर, ज्ञानेश्वर नागमोते, हर्ष बांते, ज्ञानेश्वर घंगारे, अरूण मोखारे, प्रांजल देशमुख, विद्या मोरे, वेदिका डोंगरवर, पुरूषोत्तम कामडी, निलेश बाथो, प्रेमलाल मलेवार यांनी परिश्रम घेतले.

# राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावर निव्वळ राजकीय पुनर्वसन नको : डॉ. ॲड. अंजली साळवे



**नागपूर :** राज्यात अशोक खरात प्रकरणामुळे राज्यभर राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रुपाली चाकणकरांवर झालेल्या आरोपामुळे त्यांनी नुकताच राजीनामा दिला. त्यामुळे आता महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावर नियुक्ती कोणाची होईल याकडे सर्वांचे लक्ष लागले असतांना राष्ट्रवादीच्या प्रदेश सरचिटणीस, महिला व बाल कायदे तज्ञ डॉ. ॲड. अंजली साळवे यांनी राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष पदावर निव्वळ राजकीय पुनर्वसन म्हणून सत्ता पक्षातील राजकीय महिलेला नियुक्ती न देता या क्षेत्रातील अनुभवी महिलेला कायदेशीर प्रक्रिया राबवून नियुक्त कारणाबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विनंती केली. *आपल्या निवेदनात महाराष्ट्र हे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि जिजाऊंच्या विचारांचा वारसा सांगणारे राज्य आहे. या राज्यात 'महिला आयोग' ही केवळ एक वैधानिक संस्था नसून, संकटात सापडलेल्या प्रत्येक महिलेसाठी तो न्यायाच्या आशेचा किरण असतो, असा उल्लेख करत खरात प्रकरण राज्याचे मुखमंत्री निष्पक्ष चौकशी करतील असा विश्वास डॉ. साळवे यांनी दर्शविला.* डॉ. ॲड. अंजली साळवे यांनी आपल्या निवेदनात राज्य महिला आयोगाचे गठण महाराष्ट्र राज्य महिला आयोग कायदा व नियम या नुसार होत असून यासंदर्भात निवड समितीसुद्धा गठित होते आणि प्रसार माध्यमातून आयोगाच्या पदावर नियुक्त होण्यासाठी लागणाऱ्या निकषासह तशी जाहिरात सुद्धा महिला बालकल्याण विभागामार्फत दिली जाते. या जाहिरातीनुसार राज्यातील महिला कायदे, धोरण व महिला अत्याचारांची प्रकरण हाताळण्याचा अनुभव असलेल्या कित्येक अनुभवी महिला आयोगाच्या अध्यक्ष व सदस्य पदावर नियुक्तीसाठी अर्ज दाखल करतात. परंतु दुर्दैवाने या महिलांना साध्या मुलाखतींना सुद्धा निवड समितीद्वारे बोलावले जात नाही आणि सरकारद्वारे परस्पर फक्त राजकीय पुनर्वसन करण्यासाठी ज्या राजकीय महिलेला महिलाविषयक कायदा, महिला धोरण, महिलांचे संविधानिक अधिकारी व त्यांची अंमलबजावणी तसेच यंत्रणेकडून त्यांची अंमलबजावणी करवून घेण्याचा अनुभव नसतांना सत्ता पक्षातील सरकार आयोगाच्या अध्यक्ष व सदस्य पदावर नियुक्त करतात असा आरोप सरकारवर करत अशा परिस्थितीत निःष्पक्ष चौकशी होईलच याची खात्री नसल्याने याचा परिणाम राज्यातील महिलांच्या संविधानिक अधिकाराच्या सुरक्षेवर होतो असे मत व्यक्त केले आहे. अधिकारी सुद्धा या राजकीय पुनर्वसित व्यक्ती पुढे हतबल होतो तर काही अधिकाऱ्यांना स्वतःच्या नोकरीची तमा न बाळगता काम करावे लागते तर काही अधिकारी राजकीय पंगे नको म्हणून गप्प राहतात असा टोलाही डॉ. साळवे यांनी निवेदनात सरकारला लावला. महिला आयोगाच्या पदावर महिला विषयक कायदा, महिला धोरण याचा अभ्यास आणि त्याची अंमलबजावणी करवून घेणे, यंत्रणेसोबत काम करण्याचा अनुभव नसलेल्या महिलांना निव्वळ राजकीय पुनर्वसन म्हणून नियुक्त न करता महिलायोग कायद्याच्या निकषात येणाऱ्या महिलांनाच कायदेशीर प्रक्रिया राबवून नियुक्त करावे अशी मागणी डॉ. ॲड. अंजली साळवे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना केली आहे.

# पक्ष्यांकरिता जलपात्रांची व्यवस्था



**अर्जुनी मोरगाव :** वाढत्या उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर पक्ष्यांना पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी या उद्देशाने शिवप्रसाद सदानंद जायस्वाल महाविद्यालय, अर्जुनी मोरगाव येथे पक्ष्यांकरिता जलपात्र लटकविण्याचा उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ईश्वर मोहुर्ले यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम महाविद्यालय परिसरात पार पडला. या उपक्रमांतर्गत महाविद्यालयाचे ग्रंथपाल प्रा. अजय राऊत आणि भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. द्वारपाल चौधरी तसेच रा.से.यो. कार्यक्रम अधिकारी डॉ. आशिष कावडे यांनी महाविद्यालय परिसरातील विविध ठिकाणी जलपात्र लटकवून पक्ष्यांसाठी पाण्याची सोय केली. या वेळी आय क्यू ए सी समन्वयक डॉ. लक्ष्मीकांत कापगते, प्रा. तेजराम चान्देवार व दिशा निखारे (बी. एस्सी सेम. 6) उपस्थित होते. उन्हाळ्याच्या दिवसांत पक्ष्यांना पाण्याची टंचाई भासू नये यासाठी दरवर्षी महाविद्यालयाच्या वतीने अशी व्यवस्था करण्यात येत असते. तसेच पक्ष्यांना सुरक्षित निवारा मिळावा यासाठी कृत्रिम घरटे (नेस्ट बॉक्स) तयार करून लावण्याचेही कार्य महाविद्यालय परिसरात करण्यात आले आहे. या उपक्रमामागील मुख्य उद्देश म्हणजे विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाबद्दल जागरूकता निर्माण करणे हा आहे. विद्यार्थ्यांनी आपापल्या घरी तसेच परिसरात पक्ष्यांसाठी जलपात्र उपलब्ध करून निसर्गाबाबत आपले कर्तव्य पार पाडावे, अशी जाणीव महाविद्यालयाच्या वतीने विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करण्याचा हा एक स्तुत्य प्रयत्न आहे.

# शिकवणी वर्गातील विद्यार्थ्यांचे स्पर्धा परीक्षेत यश



**नागपूर :** गौतम माटे यांच्या शिकवणी वर्गातून अखिल भारतीय सैनिक शाळा या प्रवेश परीक्षेत तीन विद्यार्थी पात्र ठरले ज्यात आरोही प्रशांत खांडेकर, सानिध्या जयसिंग पाटील आणि निर्भय नितीन धुर्वे यांचा समावेश आहे. तसेच याच शिकवणी वर्गातून निर्भय नितीन धुर्वे याची जवाहर नवोदय विद्यालयाच्या प्रवेश परीक्षा 2026 -2027 या सत्रात निवड झाली असून या विद्यार्थ्यांचा सत्कार कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी मान्यवरांनी मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या निर्भय नितीन धुर्वे याचा विशेष सत्कार कार्यक्रम आयोजित केला होता. या प्रसंगी दीक्षाभूमी स्मारक समितीचे सदस्य महाथेरो भदंत नागदीपंकर, माजी शिक्षिका अरूणा रायबोले, माजी नगरसेवक प्रतिक पडोळे, माजी उपसरपंच भूषण इंगोले, आनंद मेश्राम, प्रशांत गोंडाने, बाळू बावनकुळे, अरविंद चवरे तसेच मोठ्या संख्येने पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# कर्मवीर दादासाहेब ना. ह. कुंभारे यांना जयंतीनिमित्त अभिवादन



**नागपूर :** कर्मवीर दादासाहेब ना. ह. कुंभारे यांच्या जयंतीनिमित्त विविध मान्यवरांच्या उपस्थितीत आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमात बौद्ध धम्मगुरू, विधिज्ञ तसेच सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदवून त्यांच्या कार्याचा गौरव केला. यावेळी उपस्थितांनी कुंभारे यांच्या समाजकार्याची आठवण करून देत त्यांच्या विचारांचा समाजाला आजही प्रेरणादायी ठेवा असल्याचे मत व्यक्त केले. सामाजिक समता, शिक्षण आणि संघटन या क्षेत्रांतील त्यांच्या योगदानाचा विशेष उल्लेख करण्यात आला. कार्यक्रमात उपस्थितांनी एकत्रितपणे त्यांना अभिवादन करून त्यांच्या कार्याचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. भंते नागदीपंकर, अनिरुद्ध (वकील) तांबे, आरजू कांबळे, राजन बागडे, बबलू रामटेके, गौतम माटे, प्रतीक पडोले, विनोद चांदोरकर आदींनी आदरांजली अर्पण केली.

आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषदेत

# सामाजिक कार्यकर्त्यांना शाक्ययिता सन्मान



**नागपूर :** बुद्ध आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ समाजसेविक विमल आडे, निवासी संपादक संध्या राजुरकर, समाजसेविका डॉ. सविता बेदरकर यांना आंतरराष्ट्रीय बौद्ध महिला परिषदेच्यावतीने शाक्ययिता सन्मान प्रदान केला. प्रत्येक महिलांनी आदर्श घेऊन चळवळीला अधिक बळकट करण्याचा निर्धार केला पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

भदंत नागदिपंकर महास्थविर यांच्या सह विविध क्षेत्रातील संस्था संघटना हरदासनगर अर्बन क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटी जयभीम प्रवर्तक लोकप्रिय बाबू हरदास एल एन स्मृती समिती समुहघोष सामाजिक संस्था सहयोग मित्र परिवार स्त्री भुषण रमाई आंबेडकर संस्था बौद्ध प्रशिक्षण संस्थान वटथाई इंडियन बुद्धिस्ट मोनेस्ट्री बुद्ध धम्म प्रचारक आदर्श कवी मंडळ प्रियबालक भजन मंडळ परिवार बोधिमग्गो सेवा संस्था दैनिक बहुजन सौरभ परिवार, परिवर्तन विचार मंच, बॅरि. राजाभाऊ खोबरागडे प्रतिष्ठान आदींच्यावतीने अभिनंदन केले.

# मानाचा म. फुले फेटा हा जगन्नाथ गुंजाळ यांना प्रदान

## ऐतिहासिक धम्मभूमिवर प्रबुद्ध रंग भूमिला 48 वा वर्धापन दिन साजरा



**देहूरोड :** महात्मा फुले यांचा फेटा म्हणजे ही राष्ट्राची संपत्ती आहे, देशाचे वैभव आहे या राष्ट्राच्या संपत्तीने आणि देशाच्या वैभवाने तुमचा सन्मान झाला आहे. माझ्या हस्ते तुमचा झालेल्या सन्मान म्हणजे खऱ्या अर्थाने मी श्रीमंत झालो आहे. ही फुल्यांच्या विचाराची श्रीमंती आहे, असे प्रतिपादन धम्मरत्न प्रबुद्ध साठे यांनी केले. ऐतिहासिक धम्मभूमिवर प्रबुद्ध रंगभूमिच्या 48व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित केलेल्या म. फुले फेटा प्रदान समारंभात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रबुद्ध रंगभूमीचे प्रवर्तक भीमपुत्र टेक्सास गायकवाड हे होते. प्रबुद्ध रंगभूमिचे विश्वस्त जगन्नाथ गुंजाळ यांना प्रबुद्ध साठे यांच्या हस्ते क्रांतिबा महात्मा जोतिबा फुलेंचा फेटा, पंचशील आभूषण आणि पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अ.भा. प्रबुद्ध नाट्य परिषदेने डॉ. कीर्तिपाल गायकवाड यांनी तर पाहुण्यांचे स्वागत ॲड. क्षितिज गायकवाड यांनी केले. महात्मा फुलेंचा फेटा आणि सन्मानचिन्ह स्विकारून सत्काराला उत्तर देताना जगन्नाथ गुंजाळ यांनी आपण केलेले बौद्ध धर्मांतर व सामाजिक कार्य याचा ऐतिहासिक धम्मभूमीवर झालेल्या सन्मानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करून टेक्सास दादाच्या मैत्रीचा गौरव असल्याचे नमुद केले. यावेळी जुगन्नाथ गुंजाळ यांच्या कार्याचा गौरव करतांना संजय चव्हाण शिवराज वाघमारे, भीमदास आरु, मीना गायकवाड, रंजना सोनवणे, मंदाकिनी भोसले, मिलिंद तायडे, अशोकराव गायकवाड, राहुल खांडेकर, ॲड. बाबा वानखडे, बापूसाहेब गायकवाड, राजाभाऊ गायकवाड, मंगलदास पडवेकर यांनी सदिच्छापर आपले विचार व्यक्त केले. यावेळी सत्कारार्थी जगन्नाथ गुंजाळ यांच्या जीवनावर रंजना सोपवणे आणि मंगलदास पडवेकर यांनी कविता सादर केल्या. त्यानंतर प्रबुद्ध रंगभूमी, अ. भा. प्रबुद्ध नाट्य परिषद, बुद्ध विहार कृती समिती, धम्मभूमी महिला उपासक संघ आणि बहुजन संघटक चॅनेलच्या वतीने जगन्नाथ गुंजाळ यांचा विशेष सत्कार केला.या कार्यक्रमास रिपाई नेते सुरेश गायकवाड, यशवंतराव गायकवाड, प्रा. नितीन कांबळे, यमराज इंगळे, सुदाम कांबळे आदि मान्यवर उपस्थित होती.



# सिकलसेल रुग्णांसाठी मोफत तपासणी व औषध शिबिर

**नागपूर :** बहार फाउंडेशन नागपूर, सिकल सेल सोसायटी ऑफ इंडिया नागपूर व बाणाई नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने सिकलसेल रुग्णांसाठी CBC टेस्ट तसेच मोफत हायड्रॉक्सी युरिया व फॉलीक ॲसिड औषध वितरण शिबिर नेहमीप्रमाणे आयोजित करण्यात आले. या शिबिरात बालको मेडिकल सेंटर, न्यू रायपूर येथील ऑन्कोहीमटोलॉजिस्ट डॉ. निलेश जैन यांची विशेष उपस्थिती लाभली. त्यांनी रुग्णांची तपासणी करून योग्य उपचार, आरोग्य सल्ला व मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. अशोक उरकुडे व या संपत रामटेके यांनी डॉ. जैन यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व आभार व्यक्त केले. शिबिरात सिकल सेल रुग्णांची CBC व HPLC चाचणीसाठी नमुने घेण्यात आले तसेच प्रत्येकी एक महिन्याच्या हायड्रॉक्सी युरिया टॅब्लेटचे मोफत वितरण करण्यात आले. शिबिरात डॉ. क्षितिज सूर्यवंशी व डॉ. नमन फुले यांनीही सहभाग नोंदविला. विशेष म्हणजे डॉ. क्षितिज सूर्यवंशी हे स्वतः सिकल सेल योद्धे असून ते इतर रुग्णांना उपचार व मार्गदर्शन करून प्रेरणादायी कार्य करत आहेत. त्यांचे स्वागत संजीव गजभिये यांनी केले. सुरेश तामगाडगे, डॉ. चंद्रशेखर गायकवाड, राजेश लोखंडे, जया संपत रामटेके, निळकंठ पांडे, संजीव गजभिये, प्रीती नगरारे, बाणाईचे अध्यक्ष इंजि. अरविंद गेडाम, जयंत इंगळे, विजय खापर्डे व सतीश तेलंग यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'शिस्तभंग' कवितेला विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात मानाचे स्थान



**नागपूर :** संत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या बी.कॉम. प्रथम वर्षाच्या मराठी साहित्य अभ्यासक्रमात कवी प्रभाकर तांडेकर 'प्रदत्त' यांच्या 'शिस्तभंग' या कवितेचा समावेश करण्यात आला आहे. गेल्या चार दशकांपासून साहित्य क्षेत्रात सक्रिय असलेल्या 'प्रदत्त' यांनी काव्य, समीक्षा, हायकू आणि विविध लेखनप्रकारांत उल्लेखनीय योगदान दिले आहे. त्यांचे अनेक काव्यसंग्रह, हायकूसंग्रह व चरित्रग्रंथ प्रकाशित झाले असून त्यांच्या साहित्यकृतींना शैक्षणिक पातळीवरही मान्यता मिळाली आहे. नवोदित साहित्यिकांना मार्गदर्शन, विविध साहित्य संमेलनांतील सक्रिय सहभाग आणि परीक्षणाच्या माध्यमातून त्यांनी साहित्यविश्वात वेगळी ओळख निर्माण केली आहे.

या कवितेचा विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात समावेश झाल्याने साहित्य क्षेत्रातून समाधान व्यक्त होत असून कवी 'प्रदत्त' यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनेक प्रतिभावंत साहित्यिकांनी, मान्यवरांनी तसेच सामाजिक, सांस्कृतिक व साहित्यिक संस्थांनी कवी 'प्रदत्त' यांचेवर अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. यात लोकनाथ यशवंत, डॉ. रवींद्र शोभणे, डॉ. गणेश चव्हाण, डॉ. कृष्णा साकुळकर, डॉ. अरूण देशमुख, डॉ. सत्यवान मेश्राम, प्रमोद काळबांडे, संध्या राजूरकर, निरंजन मार्कंडेयवार, ऊर्मिला देवेन (जपान), मनोज भारशंकर (अबुधाबी), डॉ. नितीन चव्हाण (ऑस्ट्रेलिया) 'अक्षरक्रांती फाऊंडेशन'चे शंकर घोरसे, प्रमोदकुमार अणेराव, प्रा. पुंडलिक भामोदे व इतर मान्यवरांचा समावेश आहे.

# सम्राट अशोक भारताचा तिसरा मौर्य सम्राट



**नागपूर :** सम्राट अशोक बुद्ध विहार, इमामवाडा, रामबाग जयंती मैदान, नागपूर येथे कार्यक्रम केला होता. सम्राट अशोक हे मौर्य घराण्यातील तिसरे शासक होते आणि भारत वर्षात ते सर्वात पहिले चक्रवर्ती सम्राट होते; ते आधी बिंदुसार होते. चक्रवर्ती सम्राट अशोक हे भारतीय इतिहासातील सर्वात महत्त्वाचे लोककल्याणकारी राजा होते. सुमारे 40 वर्षांच्या विस्तृत राज्यकाळात त्यांनी अफगाणिस्तान, इराण, आसाम म्हैसूर आणि अनेक ठिकाणी राज्याचा विस्तार केला. सम्राट अशोक यांनी मौर्य धम्माराखित, धर्माराजिका, धम्माराजिका, चक्रवर्ती, सम्राट, प्रियदर्शी असे खूप महान विचार मांडले. 'अशोक स्तंभ' हे भारताचे राष्ट्रचिन्ह आहे. भारत ध्वज भारत, पाकिस्तान, नेपाळ, बांगलादेश, अफगाणिस्तान, भूतान, इराण तर्कमेनिस्तान, ताजिकिस्तान, उझबेकिस्तान अशा अनेक ठिकाणी सम्राट अशोकांनी सुरेख कार्य केले. भारताच्या मोठ्या भूभागावर सम्राट अशोकांना 'चक्रवर्ती सम्राट' असे म्हणतात. चक्रवर्ती सम्राट हे 'सम्राटांचा सम्राट' जगाच्या इतिहासात असे अनेक सम्राट होउन गेले. त्यांचे उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्ये आहेत. सम्राट अशोक हेच महान चक्रवर्ती सम्राट झाले. सम्राट अशोकांनी एक ही युद्ध हरवले नाही. कलिंगाच्या युद्धातील 'मह' त्यांच्या राज्याचे केंद्रस्थान ज्याला बिहार म्हणतात तो मगध होता. पटणा म्हणून ओळखले जाणारे पाटलीपुत्र हेच राजधानी होते. कलिंगाच्या युद्धात झालेल्या मनुष्यहानी पाहून त्यांनी प्रचलित वैदिक परंपरा झुगारून हिंसेचा त्याग केला. त्यांनी मानवतावादी बौद्ध धर्माचा स्वीकार केला तसेच नंतरच्या आयुष्यात त्यांनी स्वतःला बौद्ध धर्माच्या प्रसारास समर्पित केले. सम्राट अशोकांनी बौद्ध धर्म संपूर्ण आशिया खंडात पसरवला होता. अशोका विषयी ऐतिहासिक माहिती भारतात सत्य, अहिंसा, प्रेम, सहिष्णूता व शाकाहारी जीवनप्रणाली सगळीकडे प्रसिद्ध झाली. सम्राट अशोकांचे शिलालेख हे मौर्य इतिहासाचे महत्त्वाचे साधन आहे. सर्वप्रथम ब्रिटिश अभ्यासक जेम्स प्रिन्सेप यांनी अशोकाचे शिलालेख सन 1837 मध्ये वाचले होते. ते अनेक भाषांचे अभ्यासक होते. अशोकाचे शिलालेख हे ब्राह्मी, खरोष्ठी आणि अरेमाइक या तीन लिपींमध्ये आढळलेले आहेत. त्यातील अनेक अभिलेख हे ब्राम्ही लिपीतील असून ते जेम्स प्रिन्सेप यांनी वाचले. चक्रवर्ती सम्राट अशोकाने आपल्या शिलालेखामध्ये स्वतःला 'देवानाम प्रिय' असे संबोधले आहे. कलिंग युद्धाचा स्वीकार बौद्ध धर्मात स्वीकृत करण्यात आला. बौद्ध धर्माची तत्त्वे शिलालेखात आलेली आहेत. सम्राट अशोक हा भारतातील पहिला चक्रवर्ती राजा होता. प्रशासनामध्ये महामंत्र हे पद सम्राट अशोकांनी त्यांच्या मुलांनादेखील धर्मप्रसारासाठी देशाबाहेर जाण्यासाठी प्रेरणा दिली. प्रजा कल्याणाचे अनेक उपक्रम हाती घेऊन अनेक ठिकाणी धर्मशाळा बांधल्या. अखिल भारतीय स्तरावर चंद्रगुप्त आणि सम्राट अशोक यांचे कार्य खूप महत्त्वपूर्ण राहिले आहे. अशोकाने बौद्ध धर्माची शिकवण देताना लोककल्याणकारी राज्याच्या निर्मितीला चालना दिली. शांततेच्या मार्गाने बौद्ध धर्माच्या प्रसाराला सम्राट अशोकांनी चालना दिली. धम्मचक्र परिवर्तन करणारे सम्राट अशोक हे प्राचीन भारतातील एक श्रेष्ठ व चक्रवर्ती शासक ठरले आहेत. अनेक इतिहासकारांनी सम्राट अशोकाच्या कार्याचा सुंदर गौरव केलेला आहे. गौतम बुद्धांचे 84000 बुद्ध विहार संपूर्ण भारतात निर्माण केले. असे अभ्यासपूर्ण विचार प्रा. डॉ. एम.एस. वानखेडे यांनी सादर केले. सम्राट अशोकांवर माजी न्यायमूर्ती नरेश बनसोड यांनी वक्तव्य सादर केले. इंजिनिअर भुषण मून यांनी अध्यक्षीय भाषण केले. प्रा. राहुल मून यांनी प्रास्ताविक केले. आभार प्रदीप नारायणे यांनी मानले.

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648